# नवनीत

मे २००७



# रातराणी

"आम्हाला एक घुबड सापडलंय. ते आजारी आहे. त्याला घेऊन येऊ का?" गिरवीच्या कदम सरांचा फोन आला. ते दोन दिवसांनी घुबड घेऊन आले. सुदैवाने त्याला काही लागले-बिगले नव्हते आणि ते आजारीही नव्हते. फक्त लहान असल्याने त्याला उडता येत नव्हते.

आमच्या घरी फलटण परिसरात सापडलेल्या सर्व वन्य प्राणीपक्षाचे अनाथाश्रम आहे.त्यात आत्तापर्यंत झाडावरून पडून जखमी झालेले शिंगचोचाचे पिलू, लाकूडचोरांनी पाडलेल्या झाडाच्या ढोलीत सापडलेली तांबटची दोन पिले, वादळी रात्री घरातील दिव्याने आकर्षित होऊन आलेले बुलबुलचे पिलू, आई ट्रकखाली मेल्यामुळे अनाथ झालेले उदमांजराचे पिलू, गलोलच्या दगडाने जखमी झालेला खंड्या, पतंगाच्या मांजाने जखमी झालेले घुबड असे अनेक प्राणी-पक्षी आतापर्यंत आमच्या अनाथाश्रमात काही दिवस राहून पुन्हा स्वतंत्र जीवन जगण्यासाठी सोडून दिले गेले आहेत.

गिरवीचे घुबड 'ब्राऊन वुड आऊल' जातीचे आहे. नर-मादी वेगवेगळे ओळखू येत नाहीत. या घुबडाचा लाडिक स्वभाव पाहून ती मादी असावी असे ठरवून आम्ही तिचे नाव 'रातराणी' ठेवले. रातराणी मटण खाते. आठवड्याला तिला साधारण दीड किलो मटण लागते. खाणे झाल्यावर तिला मोठ्या भांड्यात चोच आणि तोंड धुवावे लागते. अगदी भांड्याच्या कडेला चोच घासून ती धुते. खाताना घशातून लाडिक आवाज काढते. एकूणच गप्पा मारायला तिला फार आवडते.

आता एक महिन्यानंतर तिचा आकार दुप्पट झाला आहे. पायांवर पिसे आली आहेत. लहानपणची मऊ पिसे जाऊन जास्त मोठी आणि मजबूत पिसे छातीवर-पाठीवर आली आहेत. पंखांची पिसे लांब झाली आहेत. आणखी दोन-तीन आठवड्यांत तिची ती विंचुर्णी परिसरात स्वतंत्रपणे उडायची वेळ येईल. अशा या गोंडस आणि गोड स्वभावाच्या 'रातराणी' ला कोण म्हणेल अपशकुनी?

प्रगत शिक्षण संस्था, फलटण

वार्षिक पत्रिका

# नवनीत

मे २००७

**संपादकीय मंडळ**

गौरी कदम

संचिता निंबाळकर

गणेश कदम

नम्रता मगर

**संपादकीय सहाय्य**

डॉ. मॅक्सीन बर्नसन

डॉ. मंजिरी निमकर

सौ. स्वामिनी रूद्रभटे

**रेखाचित्रे**

मिलिंद, मुईन, विराज, स्वप्निल

ओमप्रकाश, दीपिका, अनिकेत (इ.७ वी)

गौरी, प्रांजली, अक्षता (इ. ४ थी)

**मुखपृष्ठ**

मुईन आतार (इ.७ वी)

**प्रकाशन** : प्रगत शिक्षण संस्था, रिंगरोड, फलटण ४१५ ५२३

**संगणकीय अक्षरजुळणी** : प्रकाश अनभूले व सीमा निंबाळकर, कमला निंबकर बालभवन

**मुद्रण** : श्री. प्रदीप पवार, कमिन्स डिझल इंडिया प्रिंटींग युनीट, प्रगत शिक्षण संस्था, फलटण

**फोन** : ०२१६६-२२३०४१

**email** : pssknb@dataone.in

**website : www.pragatshikshan.com or www.indiaprogressiveeducation.com**

# अनुक्रमणिका


अंकासंबंधी चार शब्द /डॉ. मॅक्सिन बर्नसन/ iii
माझे आजोबा/गौरी म्हेत्रे/१
अनुभवः मतिमंद मुले आणि आम्ही/शिवानी थोरात/३
माझ्या घराची खिडकी/अक्षता मगर/ ४
चिडीया/ऐश्वर्या भोईटे/५
दीवाली/अमर सस्ते/एक था पहलवान/नीरज राऊत/६
बादल/सुरज घाडगे/सेब/सूर्यभान चव्हाण/सपना/पुष्कीन साळूंखे/७
अळीचे संगोपन/प्रांजली भुजबळ/८
साखरपुड्याची गोष्ट/जयकुमार मेटे/९
फोटो/कंगवा/ऋतुराज कदम/रस्ता/ची ची कर्र कर्र/प्रांजली भुजबळ/१०
एक प्रसंग/प्रीतम पवार/११
वारे विकासाचे/ओमप्रकाश धुमाळ/१२
माझे पोहणे/सृष्टी कदम/१४
अपघात /प्रक्षा गायकवाड/१६
चोरी/रेश्मा शिंदे/१८
भीतीचे ढग/दीपिका जाधव/१९
आयुष्य/शलाका उंडे/२०
जम्मू प्रवास/प्रथमेश इनामदार/२१
बिडीचे झाले भजन/विराज तावरे/२३
सोडत नाही/मेघा चौधरी/२४
अविस्मरणीय कॅम्प/क्षितिजा गोडसे/२५
कळलं का?/करिश्मा मुल्ला/अधुरे नाते ठेऊ नको/शलाका उंडे /२८
लेकरू/सई भोसले/२९
रस्त्यावरचा एक कलाकार/संचिता निंबाळकर /३१
माझे मौनव्रत/मौलिक सोनार/३३
अन्याय/श्रध्दा कुलकर्णी/३५
दुःख/नम्रता मगर/३६
आजोबा/सुशांत काकडे/३८

A Bad Day/Dakshata Kakade/ 39
Our Cricket Match/Abhishek Sawalkar/ 39
My Unforgettable Experience/Minal, Pranav, Shailesh/40
Fearful Sounds, Fearful Silence/Sharad Nimbalkar/42
The Real Joy of Rain/Nikhil Hendre/ 44

# अंकासंबंधी चार शब्द

१ मे रोजी प्रगती पुस्तकाबरोबर प्रत्येक मुलाच्या हातात, 'नवनीत' चा अंक देता येईल, ही फार समाधानाची गोष्ट आहे. अंक आकर्षक व वाचनीय असून सगळ्यांना आवडेल व ते मुलांचे कौतुक करतील अशी खात्री आहे.

अंकातील मजकूर वाचत असताना मला इंग्रज शिक्षण तज्ज्ञ जेम्स ब्रिटन ह्यांनी शालेय मुलांच्या लेखनाबद्दल मांडलेला दृष्टिकोण आठवला. ब्रिटन ह्यांच्या मते, मुले जीवनाचा अन्वयार्थ लावण्यासाठी लेखनाचा उपयोग करतात. सदर अंकातील मराठी लेखनामध्ये हे प्रकर्षाने दिसून येते. एक-दोन अपवाद सोडून मुले जसजशी मोठी होतात तसतसे त्यांनी हाताळलेले विषय व दृष्टिकोण बदलत जातात. अंकातील सगळ्यांत लहान लेखक म्हणजे चौथीची मुले. अशी मुले घर व बाहेरचे जग ह्यांच्या सीमारेषेवर असतात. एक मुलगी लाड करणाऱ्या आजोबांविषयी लिहिते. दुसरी लिहिते आपल्यापेक्षा वेगळ्या वाटणाऱ्या पण गोड व कलागुण संपन्न मतिमंद मुलांबद्दल. निसर्गाचे बारीक निरीक्षण दोन लेखांत दिसते—एकात सुगरण पक्ष्याच्या घरट्याविषयी व दुसऱ्यात अळी-कोष-पतंग ह्या रूपांतराबद्दल. मुलांचे निरीक्षण केवळ सौंदर्याचा आस्वाद घेण्यासाठी नसून शास्त्रीय ज्ञान मिळविण्यासाठी आहे हेही जाणवते. एका कवितेमध्ये मुलगी अनोळखी पक्ष्याचे नाव पुस्तकात शोधण्याचा प्रयत्न करते ह्यावरून मुलांची माहितीची भूक दिसते.

पाचवीतल्या मुलांच्या दोन लेखांमध्ये बाहेरच्या सामाजिक जगाबद्दल दोन वेगवेगळे अनुभव दिसतात. एका लेखामध्ये खाली चाललेल्या लगबगीबद्दल मुलाला कुतूहल वाटते व आईला फसवून तो काय आहे ते बघायला जातो. दुसऱ्या लेखात अंधारात दुकानात आलेल्या अनोळखी ग्राहकाची मुलाला भीती वाटते, त्या अनुभवाचे तो कथन करतो.

सातवी ते दहावीतल्या मुलांनी विविध विषय हाताळले. काही मुले वैयक्तिक विकासाबद्दल लिहितात, तर काही सामाजिक. काहीजण इतरांबद्दल— वयोवृध्द एकटे असलेले आजोबा किंवा रस्त्यावरील कलाकार — करुणा दाखवतात. चोरी, अपघात, मृत्यू अशा खडतर अनुभवांबद्दल लिहिताना जीवनातील अनिश्चिततेला सामोरे जाण्यासाठी मुलांना धैर्य मिळाले असेल, असे वाटते. 'जम्मू प्रवास' हा प्रथमेश इनामदार ह्या चौथीतल्या मुलाचा लेख सातवीच्या विद्यार्थ्यांच्यांबरोबर घेतला हे अगदी योग्य आहे. सुरुवातीला हा लेख म्हणजे केवळ कुशल प्रवासवर्णन

वाटते, पण ज्या वैष्णवदेवीच्या मंदिरात प्रथमेशने दर्शन घेतले होते त्या मंदिराच्या परिसरात तीन दिवसांनंतर दहशतवाद्यांच्या हल्ल्यामध्ये बरेचजण मृत्युमुखी पडले, हे वाचून लेखाला सखोल अर्थ आहे हे लक्षात येते.

अंकात विनोदी लेखन तसे थोडेच आहे, पण जे तीन लेख आहेत— 'माझे मौनव्रत', 'दु:ख' व 'बिडीचे झाले भजन' हे सर्व छान आहेत. मोठ्या मुलांच्या काही कविता चांगल्या आहेत— विशेषत: 'अधुरे नाते ठेऊ नको' व 'अन्याय'. 'अन्याय' ह्या कवितेमध्ये ब्राम्हण मुलगी दलिताच्या दृष्टिकोणातून लिहिते ही फार महत्त्वाची गोष्ट वाटते.

ह्या वर्षी हिंदी व इंग्रजी लेखन कमी आहे. इयत्ता आठवीतल्या शरद निंबाळकरच्या लेखासंबंधी लिहिल्याशिवाय रहावत नाही. शरदने मूळ निबंध मला दिला तेव्हा मला जाणवले की लेख प्रभावी आहे, पण काही ठिकाणी वाक्यरचना न जमल्यामुळे पूर्ण अर्थ कळत नव्हता. त्याच्याबरोबर प्रत्येक वाक्य समजून घेऊन मी शक्य तितका कमी बदल केला. ह्या प्रक्रियेतून तयार झालेला लेख पाहून मी विस्मयचकित झाले. सकाळी माळरानावर गेलेल्या शरदचा अनुभव— भोवतालच्या निसर्गाचा व स्वत:च्या मनाचा— वाचकांपर्यंत समर्थपणे पोचतो. ह्या दर्जाचे लेखन क्वचितच मिळते. निसर्गाच्या सान्निध्यात राहणाऱ्या मुलांकडून याप्रकारचे आणखी लेखन मिळणे कितपत शक्य आहे माहीत नाही. मात्र यंदा ते मिळाले ह्याबद्दल आनंद वाटतो.

हा अंक काढण्यासाठी अनेकांनी खूप मेहनत घेतली— मंजुताई, प्रकाशदादा, आशाताई, जाई निंबकर इतर शिक्षक, लेखक व बालचित्रकार. भारनियमनाशी सामना करून प्रदीप पवारांनी अंक छापला.

यंदाही अजिता काळे यांच्या स्मरणार्थ निधीतून छपाईचा खर्च मिळाला. नेहमीप्रमाणे वाटते की मुलांचे कौतुक करण्यासाठी त्या आज आपल्याबरोबर हव्या होत्या. असो.

**मॅक्सीन बर्नसन**

# माझे आजोबा

**गौरी म्हेत्रे**

**इयत्ता ४ थी**

एन.जी. माळी हे नाव आहे माझ्या लाडक्या आजोबांचे म्हणजे माझ्या आईच्या वडिलांचे. कल्याणला राहतात ते! चिऊ म्हणतात ते मला!

आजोबा रोज सकाळी लवकर उठतात व फिरायला जातात. तेथे ते व्यायाम व प्राणायाम करतात. ते मला खूप खूप हसवतात आणि म्हणतात, हसणे आरोग्यासाठी खूप चांगले असते. ते मला त्यांच्या लहानपणीच्या गमती-जमती सांगतात. ते जेव्हा गाणी-गोष्टी सांगतात तेव्हा ते ॲक्टिंग करून दाखवतात आणि ते ऐकताना व बघताना खूप खूप मज्जा येते.

यावेळेस मी कल्याणला गेले तेव्हा मला बरे नव्हते. ते मला मोसंबी आणायचे कारण मला मोसंबी खूप आवडतात ना!

मी कल्याणला गेल्यावर त्यांना खूप खूप आनंद होतो. ते माझे खूप लाड करतात, मला बागेत नेतात. नाटकाला नेतात. सर्कसला नेतात. माझ्या बरोबर खरेदीला सुध्दा येतात. मी कल्याणला गेल्यावर आमचा दगडी किल्ल्यावर एकतरी फेरफटका असतोच. तिथून येताना गणेश घाटावरील वेगवेगळ्या प्रकारच्या खेळांमध्ये खेळू देतात.

सर्वांना मदत करावी असे ते नेहमी सांगतात व ते स्वतः सुध्दा तसेच




वागतात. त्यांनी मला केलेली मदत तर मी कधीच विसरणार नाही. आजीच्या भजनी मंडळात माझ्या नाचाचा कार्यक्रम होता. त्या नाचामध्ये हातात व डोक्यावर पणती ठेऊन नाचायचे होते. आम्ही पणत्या सजवल्या होत्या. डोक्यावर पणती नीट बसावी म्हणून ती जरा वेगळी होती. मी नाचाचे सर्व सामान व्यवस्थित काढून ठेवले. दुसऱ्या दिवशी सकाळी नाच होता ना! मम्मीने मला पुन्हा पुन्हा बजावले असताना सुध्दा माझ्याकडून डोक्यावर ठेवायची पणती फुटली. मम्मी माझ्यावर खूपच चिडली कारण रात्रीचे पावणे बारा वाजले होते. आणि सर्वांनाच झोप येत होती. मी तर रडायलाच लागले. सकाळी पणती सजवायला वेळ मिळणार नव्हता त्यावेळी माझा भोंगाच सुरू झाला, तो ऐकून आजोबा आले, काय झाले असेल याचा त्यांना लगेचच अंदाज आला, क्षण ही वाया न घालवता त्यांनी दुसरी पणती घेऊन, आधीच्या पणतीसारखी सजवली. त्यावेळेस मला झालेला आनंद मी शब्दात सांगूच शकत नाही. दुसऱ्या दिवशी माझा नाच खूप म्हणजे खूपच चांगला झाला. त्याचे सारे श्रेय आजोबांना जाते. ■

## बिल्ली चली कलकत्ता

बिल्ली चली कलकत्ता
चूहों ने पाई सत्ता
बोले बिल्ली रानी
तुम्हें होगी अब हैरानी ॥

हम सब को खाकर
भोला मुँह बनाकर
जाती हो सबके घर ॥

बिल्ली रानी तुम्हें मजा चखाऊँगा
गले में घंटी लगाऊँगा
भागकर जब आएगी बिल्ली रानी
याद दिलाऊँगा उसे नानी ॥



**सुरज घाडगे**
**इयत्ता ६ वी**

# अनुभव - मतिमंद मुले आणि आम्ही

**शिवानी थोरात**

**इयत्ता ४ थी**

मतिमंद मुले म्हणजे वेगळीच. गाणे गाणारी स्वप्नातील पाखरे. त्या मुलांना शिकवायला इतकी मजा येते की काही बोलायलाच नको. मतिमंद मुलांचे जीवन काही वेगळेच असते. ती मुले कितीही मोठी झाली तरी त्यांचे अजून लाड काही संपत नाहीत. असे वाटते की ती अजून रांगणारी मुले आहेत.

त्यांच्या अंगात इतक्या कला असतात की जे आपण शिकवू ते लगेच करून दाखवणार.

फलटणमधे मतिमंद मुलांची एक शाळा आहे. ८ डिसेंबरला त्यांच्या शाळेचा वाढदिवस होता. त्यानिमित्त ती आमची शाळा बघायला आली होती. तेव्हा त्यांच्या बरोबर काही करण्यासाठी चौथीचा म्हणजे आमचा वर्ग निवडला. आम्हाला खूप आनंद झाला. आम्ही विचार करू लागलो काय करायचे? त्यांना गाणी म्हणून दाखवायची असे ठरविले.

ती मुले आली. आम्हाला खूप आनंद झाला. आशाताईपण आमच्या बरोबर होत्या. त्यांनी चेंडू फेकताना आपले नाव सांगण्याचा खेळ घेतला. त्यानंतर कागद काम घेतले. त्यामधे वेगवेगळे गट केले. आमच्या गटात शुभम आणि विष्णू होते. माझ्या बरोबर चौथीतले अक्षदा, स्नेहा आणि अक्षय होते. आमचे चित्र फुलपाखरांचे होते. आधी आम्हाला रंगीत कागद दिले. मग आम्ही त्या दोघांना बारीक तुकडे करायला दिले. तुकडे केल्यावर आम्ही त्यांना चिकटवायला दिले. आम्ही त्यांना आकार काढून दिले व बाकीचे सर्व त्यांनी पूर्ण केले. ते चित्र खूप सूंदर झाले. आम्हाला ते फार आवडले. आम्हाला ठसे कामही घ्यायचे होते. पण त्यांना वेळ नव्हता. त्यांच्या शाळेत खाऊ होता. त्यांना फार घाई झाली होती. चिकट काम झाल्यावर आम्ही वर्तूळ करून बसलो व त्यांना गाड्यांची, प्राण्यांची, माणसांची चित्रे दाखवली. त्यांनी ती बरोबर ओळखली.

मतिमंदांच्या शाळेत वेगवेगळ्या प्रकारच्या सुंदर राख्या बनवतात. ते इतक्या सुंदर राख्या बनवतात की आम्हाला सुध्दा बनवता येणार नाहीत.

जेव्हा ते त्यांच्या शाळेत निघाले तेव्हा आम्ही त्यांना ते गाडीत बसेपर्यंत टाटा करत होतो. ती मुले गेल्यावर आम्हाला खूप उदास वाटले. ■

# माझ्या घराची खिडकी

अक्षता मगर

इयत्ता ४ थी



माझ्या खिडकीतून आंबा व नारळ यांच्यामधील सूर्याचा लाल फिका गोळा बघायला मी सर्व आटोपून खिडकीसमोर येऊन बसते. सूर्याची किरणे माझ्या खिडकीतून येतात. माझ्या खिडकीसमोर नारळ, आंबा, वड, रामफळ यांच्यासारखी भरपूर झाडे आहेत. म्हणून खूप खूप पक्षी येतात. जास्त करून बोरीच्या झाडावर पक्षी येतात. निळ्या, पांढऱ्या, पोपटी, पिवळ्या रंगाचे. त्यांची नावे सुध्दा मी ग्रंथालयातील पुस्तकात शोधत असते. त्याचबरोबर मस्त मस्त फुलपाखरेही दिसतात.

एकदा अचानक नारळाची शीर चोचीत धरून पिवळ्या धमक रंगाचा एक पक्षी मला उडताना दिसला. मी त्याचे नाव शोधण्याचा खुप प्रयत्न केला. पण काही केल्या नाव सापडेना. ते पक्षी घरटी करीत होते. काही दिवसांनी त्यांची घरटी बघून मला कळाले की हा सुगरण पक्षी आहे.

मग मी शाळेत गेल्यावर ताईंना ही गोष्ट सांगितली. ताईंनी त्याचे निरीक्षण करण्यास सांगितले. मी रोज शाळेतून आल्यावर ती घरटी बघण्यास कपडे न बदलताच माझ्या खिडकी समोर जाऊन बसते. कालची घरटी आज कुठपर्यंत पूर्ण झाली हे माझ्या युक्तीने शोधत असे. ती युक्ती अशी की आजचे घरटे जरा हिरवे दिसत असे. म्हणजे मला कळायचे की हे आजचे बांधकाम.

एकदा बोरीच्या झाडावर खूप किलबिलाट ऐकू आला. मी बारकाईने निरीक्षण केले तर खूप घरटी पूर्ण झाली होती व नरांनी माद्यांना बोलावले होते. मग काही दिवस मला सुगरण मादी दिसली नाही. मला कळाले की ती अंडी घालत आहे. काही दिवसांनी मला घरटी हालताना दिसली. मग मी ती का हालत आहेत हे ताईंना विचारले. ताई म्हणाल्या की घरट्यातील पिले हलत आहेत. म्हणून घरटी हलत आहेत. काही दिवसांनी दोन छोटे सुगरण झाडावर बसलेले दिसले. म्हणजे दोन छोटी पिल्ले आहेत तर. घरटी करून अंडी घालून पिल्ले बाहेर निघेपर्यंत त्या घरट्यांवर बोरीची कोवळी पाने आली होती. त्या वाळलेल्या काड्यांच्या केलेल्या घरट्यांना सौंदर्य प्राप्त झाले होते. आपण जसे दिवाळीत आपले घर दिव्यांनी सजवतो तसे त्या सुगरणीच्या घरट्यांना त्या कोवळ्या पानांमुळे निसर्गनिर्मित सौंदर्य प्राप्त झाले होते. म्हणजे त्यांची जणू दिवाळीच होती. तेवढ्यात एका मांजराने टुणदिशी उडी मारली व ते वरच्या फांदीवर जाऊन बसले. त्याने माझे लक्ष वेधून घेतले. पण सुगरणींची घरटी खाली लोंबत असल्यामुळे तिला काहीही करता आले नाही. मग ती मांजर दोन फांद्यांच्या मधे शेपटी हलवत अंग बारीक करून बसली व माझ्याकडे बघून म्यॉंव म्यॉंव करू लागली. मग मी पटकन जाऊन टोपल्यातील चपातिचा तुकडा आणला व तिच्या दिशेने टाकला पण नेम चुकला. आणि ती शेपटी हलवत बसलेली गोबरी मांजर चपातीच्या लोभानं खाली पळाली. अशा अनेक गमती जमती मला माझ्या खिडकीतून दिसतात. म्हणून मला माझी खिडकी फार आवडते.

■

## चिडिया

चिडिया चिडिया भाग जा
ढमढम ढोल बजा जा
कौए को भगा जा
दोनो रोटी खा जा।

**ऐश्वर्या भोईटे**
**इयत्ता ६ वी.**



## दीवाली

दीवाली आई, दीवाली आई
हम सब के घरों में,
खुशियाँ लाई।
कहीं रँगाई, कही लिपाई
हो रही हैं, चारों ओर सफाई
माँ चली बनाने मिठाई
मुझे है दीवाली का इंतजार
लड्डू, सेव खाऊँगा बार-बार
दीवाली आई, दीवाली आई
घरों में खुशियाँ लाई।

**अमर सस्ते**
**इयत्ता ६ वी**





## एक था पहलवान

एक था पहलवान
नाम था उसका जयराम
खाता दो बकरे सुबह शाम
एक दिन न मिला बकरा
आकर बेचारा मुर्गी पर ठहरा
मुर्गी के बाद पिया दो लिटर मसाला दूध
नींद आ गई सो गया बहुत खुब
आठ बजे जाना था खेलने कुस्ती
अभी तक नही गई उसकी सुस्ती
जब वह उठा तो बज गए थे बारा
ठप्प हो गया था कार्यक्रम सारा।


**नीरज राऊत**
**इयत्ता ६ वी**

## बादल

देखो-सुनो आए है बादल
रिम-झिम वर्षा लाए है बादल
बच्चे नाच रहे हैं छम्-छम्
मेंढक बोल रहे हैं टर्-टर्
गर्मी देखो कैसी भागी,
मन-मन में खुशियाँ जागी
रिम-झिम वर्षा लाए बादल
धूम-धडाम बाजे बादल ।



**सुरज घाडगे**
**इयत्ता ६ वी**



## सेब

कश्मीर का लाल-लाल सेब
उसके लिए खाली करो जेब
फलवाला चिल्लाता ले लो
मीठा हलुआ-सा है देखो
अच्छी सेहत इससे पाओ
छिलके सहित गप से खाओ ।

**सूर्यभान चव्हाण**
**इयत्ता ६ वी**

## सपना

बच्चे ने देखा सपना
सपने में था बगीचा
बगीचे में था झूला
झूले पर था बंदर
बंदर के सामने था फूल
पर सपने में नहीं था स्कूल ।

**पुष्कीन साळुंखे**
**इयत्ता ६ वी**

# अळीचे संगोपन

प्रांजली भुजबळ


इयत्ता ४ थी

"अगं प्रांजू! अगं प्रांजू!" अशी आईची हाक ऐकताच अभ्यास करता करता मी धावत अंगणात गेले. तर आईने एक काळी-कुळकुळीत अळी काठीवर धरली होती. आई म्हणाली "ही फुलपाखराची अळी तर नाही ना?" मी म्हणाले, "असेल कदाचित. चल आपण हिला पाळू". आम्ही तिला पाळायचे ठरवले. मी तिला एका बरणीत ठेवून झाकणाला छिद्रे पाडली. मी तिला वेगवेगळी पाने खायला दिली पण ती काही खात नव्हती. शेवटी मी तिला जास्वंदीचे पान खायला दिले मग ती ते पान खाऊ लागली.

एकदा काय झालं मी शाळेतून घरी आले पाहते तर काय बरणी गायब! मी सगळीकडे शोधले पण ती सापडत नव्हती. नंतर मी बाहेर आले तर आजीने बरणी बाहेर फेकून दिली होती. मी ती परत आणली पण आता माझी आजी अळीवर फार चिडली होती. असेच दिवस गेले.

एकदा मी सकाळी अळीला पाने द्यायला आले तर तिथे अळीच नाही. तेवढ्यात मला तिचा कोष दिसला. मी म्हणाले अरे इथे तर कोष आहे तिचा. मी आता फुलपाखराची वाट पाहू लागले. एक आठवडा झाला. दोन आठवडे झाले. एके दिवशी मी सकाळी कोष बघायला आले तर त्यात एक पतंग होता. मला तो फार आवडला. नंतर मी त्याला बाहेर बागेत सोडून दिले. मला पतंगाच्या अळीला सांभाळायला फार मजा आली.

■



# साखरपुड्याची गोष्ट

जयकुमार मेटे
इयत्ता ५ वी

मी गॅलरीतून सहज खाली बघत होतो. खाली लगबग चाललेली दिसत होती. मला ती लगबग बघून गंमत वाटली. खाली जाऊन बघूनच यावे असा विचार मनात आला. आई सोडणार नाही याची खात्री होतीच. तरीही बिचकत बिचकत आईला विचारले. आईने नेहमी प्रमाणे नकार दिला. म्हणून मी हसून गॅलरीतून खाली बघत राहिलो, व विचार करू लागलो की खाली कसे जाऊ. मला खाली एक फुटलेला बॉल दिसला. त्या बॉलवरून मला एक युक्ती सुचली. मी माझा बॉल खेळण्याचे नाटक केले. खेळता खेळता बॉल हळूच गॅलरीतून खाली टाकला. व मी ओरडलो आई बॉल खाली पडला. आई लगेच म्हणाली जा लवकर जा बॉल घेऊन ये.

मी आनंदाने धाड धाड करीत जिना उतरलो. खाली गेल्यावर मला छान सुगंध आला. मी पार्किंगमध्ये गेलो. तेथे छान पक्वान्न शिजत होते व सुगंधही येत होता. मी तेथेच पकडापकडी खेळत असलेल्या मुलांना विचारले की ही कसली तयारी चालू आहे? त्यातला एक मुलगा म्हणाला की आता थोड्याच वेळाने साखरपुडा आहे. तरीच मघाशी दीपाताई आईला कश्याचे तरी आमंत्रण देत होती. मी त्या मुलाला विचारले, "अरे साखरपुडा म्हणजे काय?" याचे उत्तर त्याच्यापाशी नव्हते. तोही माझ्यासारखाच अज्ञानी होता.

मी माझा बॉल शोधण्याचा प्रयत्न केला पण तो काही गर्दीत सापडत नव्हता. एकदम मला बॉल सांदाडीत गेलेला दिसला. मी तो बॉल तेथून काढला व घरी गेलो. मी आईला विचारले की साखरपुडा म्हणजे काय? आई म्हणाली साखरपुडा म्हणजे नवरी नवऱ्याच्या हातात व नवरा नवरीच्या हातात अंगठी घालतो व लग्न फिक्स होते.

आम्हालाही साखपुरड्याचे निमंत्रण होतेच. त्यामुळे मी आई बरोबर साखरपुड्याला गेलो. मी आईला कसे फसवले हा विचार माझ्या मनात घोळत होता.

■



## रस्ता

माझ्या घरापुढचा रस्ता
कोठे कोठे जातो
सकाळी मला शाळेत नेतो
माझ्यासंगे हसत बागेत येतो
पण रात्र व्हायच्या आत
मला आईच्या कुशीत सोडतो.

**प्रांजली भुजबळ**
**इयत्ता ४ थी**

## फोटो

मी आहे फोटो
भिंतीवर टांगलेला
कधी तरी पुसलेला
नाहीतर तसाच असलेला.

**रुतुराज कदम**
**इयत्ता ४ थी**

## ची ची कर्र कर्र


एकदा दुपारी मी झोपले होते
ची ची कर्र कर्र कोण करत होते?
मी आले बाहेर पळून
सगळे पक्षी गेले उडून
एक मात्र राहिला पक्षी
त्याच्या अंगावर सुंदर नक्षी
शोधले मी त्याला पुस्तकात
पण त्याची माहिती नव्हती त्यात.

**प्रांजली भुजबळ**
**इयत्ता ४ थी**

## कंगवा

कधी उलटा तर कधी सुलटा
केसात फिरायचा माझा धंदा
जिथे उवा तिथे काय?
मला तर बुवा काय नाय.

**रुतुराज कदम**
**इयत्ता ४ थी**



# एक प्रसंग


प्रीतम पवार

इयत्ता ५ वी

हो! मी टी.व्ही. बघतो. टी. व्ही. वर खेळ व इतरही कार्यक्रम लागतात. कधी कधी भुताचे कार्यक्रम लागतात. एकदा काय झाले मी एकटाच घरात असताना भुताचा कार्यक्रम बघत बसलो. त्यात एक थोडे पडलेले व थोडे टोकदार दात असलेली, पांढरे केसवाली व कपाळावर मोठे कुंकू लावलेली पांढरी साडी नेसलेली गळ्यात माळा घातलेली हातात बांगड्या घातलेली अशी विचित्र चेटकीण होती. तिचा अवतार पाहून मी आईने न सांगताच त्या दिवशी टी. व्ही. बंद केला.

उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे आत उकडत होते म्हणून बाहेर हवेला बसण्यास आलो. तेवढ्यात आई म्हणाली तू बस येथे मी चपात्या करते. आई घरात गेली. मी बसलो. एकदम लाईट गेली. आईने कंदील दुकानात आणला व ती परत घरात गेली. मी पाहतो तो तर काय आकाश ढगांनी भरून गेले होते. विजा चमकू लागल्या. पाऊस पडायला सुरुवात झाली. माणसे घराकडे पळू लागली. पोरे पावसात भिजू लागली. थोड्याच वेळात रस्त्यावरची वाहतूक थांबली. संध्याकाळचे सात वाजले होते. तरी पाऊस सुरूच होता. मी एकटाच दुकानात होतो. मी विचार करत होतो उन्हाळ्यात पाऊस कसा पडेल. विचार करता करता माझी नजर रस्त्यावर गेली. तिथून एक कंदील हलत हलत माझ्या दिशेने येत होता. मी माझा कंदील घट्ट पकडला. मला वाटले तो माझा कंदील नाही. मग तो कंदील कोणाचा? तो दुसऱ्याचा कंदील होता. हळू हळू तो

**पान १७ वर पहा**



# वारे विकासाचे

**ओमप्रकाश धुमाळ**

**इयत्ता ७ वी**

सर्व गावांप्रमाणे नाव असलेले हे एक गाव. तसे या गावाचे रूप सुंदर व मोहक. ते पाहिल्यावर मन शांत होत असे. हे गाव घनदाट झाडीत वसलेले. जणू काही निसर्गाचे लेकरूच. सह्याद्रीचा अमूल्य आस वसा लाभलेले गाव. सह्याद्रीची पर्वतरांग म्हटले की झरे, धबधबे आलेच की हो ! या गावची ओळख तशी जास्त कुणाला नव्हती. एखाद्या जिल्ह्याच्या नकाशात हे गाव चुकूनच सापडेल.

सगळीकडे जशी पहाट होते तशी इथेही होते. पण इथे पहाट नाजूक, लाजरी असते. चारचा भोंगा झाला की (म्हणजे कोंबडा आरवला की) येथील दिवसाला प्रारंभ होतो. आया बाया उठून आंघोळ करून चुलीसमोर बसतात. म्हातारी



देवाची पूजा करत असते. सगळे नवरे मात्र अजून अंथरूणातच असतात. आपले सगळे काम आवरायचे, काही तरी गिळायचे, चावडीवर येऊन तंबाकू मागायची व ती मळत दिवस ढकलायचा. हा सगळ्या नवरोबांचा नित्यक्रम. गावात नीट शाळा नाही. रहदारीचा नीट रस्ता नाही. वापरायचे सोडा पण प्यायलाही नीट चांगले पाणी नाही. रोज रेडिओ, टी.व्ही. वर बातम्या यायच्या. पण गाव अडाणी. त्याला काय कळणार सरकारी योजना?

पण त्यात एक दोन पोरे शिकली सवरलेली होती. ही पोरे चांगले काही सांगायला गेली की सारे गाव त्यांना वेड्यात काढायचे. एकदा पेपरात सरकारच्या योजनांबद्दल माहिती आली होती. ती रघूने लोकांना वाचून दाखवली. त्यावेळी त्यांच्या डोक्यात जरा प्रकाश पडला. गावच्या पाटलांनाही त्या योजना सांगितल्या. त्यांना पण ही गोष्ट पटली. लोकांना त्या बातमीने थोडा दिलासा मिळाला. आता वृक्ष पाना-फुलांनी बहरणार होते. प्रत्येक जण योजना आल्यावर काय काय होईल या विचारांची स्वप्ने रंगवत होता.

सकाळी ग्रामसभा भरली. यात शहरातून प्रमुख अधिकारी योजनांची माहिती देण्यासाठी आले होते. त्यांनी प्रत्येक योजनेची माहिती नीट समजावून सांगितली. यात सर्व काम गावकऱ्यांना करायचे होते. साधने आणि पैसे मात्र सरकार देणार होते. गावकऱ्यांना गावातील दुर्गंधी व अस्वच्छता दूर करून एक निर्मल ग्राम करायचे होते. यासाठी आता गावात संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान सुरू करायचे होते.

बघता बघता गावात स्वच्छतेचे वारे पसरू लागले. आता गाव हागनदारी मुक्त झाले. गावाला निर्मल ग्राम पुरस्कारही मिळाला. आता गावात स्वच्छता झाली होती पण पाण्याच्या अभावामुळे ती जरा कमीच वाटत होती. गावात पावसाळ्यात धो धो पाऊस पडत असे पण उन्हाळ्यात प्यायला पाणी मिळत नसे.

आता गावकऱ्यांनी बंधारे बांधण्याचे काम हाती घेतले. यातून दोन योजना गावाला मिळाल्या एक म्हणजे स्वजलधारा आणि दुसरी म्हणजे ग्रामीण रोजगार योजना. अशा योजनांमुळे गाव आनंदी व चैतन्यमय वाटू लागले. या योजनांचा तुम्हीही लाभ घेऊ शकता. अधिक माहितीसाठी आपल्या ग्राम पंचायतीत जा व या गावासारखे तुमचेही गाव स्वच्छ, सुंदर, जलमय बनवा.

■

# माझे पोहणे

**सृष्टी कदम**

**इयत्ता ७ वी**

आईच्या पोटात असतानाच मुलाला पाण्याविषयी ओढ असते.त्यामुळे त्याला जीवनात पाण्याची ओढ कायम राहते. माणूस सोडून सर्व प्राणी निसर्गतःच पोहू शकतात.माणसाला मात्र पोहणे शिकावे लागते. काही लोकांना तर पाण्याची भीती वाटते.

मला मात्र लहानपणापासून पाणी आवडते. मला पोहता यावे या दृष्टीने व माझ्या बरोबरच अनेकांना पोहण्याचा फायदा व्हावा या दृष्टीने माझ्या बाबांनी पोहण्याचा तलाव बांधला.

तलाव बांधण्याआधी मी एकदा दोनदा विहिरीतही पोहले होते. पण पाठीला टायर लावूनच. पोहण्याचा तलाव बांधल्यानंतर मी महिन्याभरात पोहणे शिकले. पोहणे हे सर्वांना शिकणे आवश्यक आहे. मला तर वाटते पोहण्याविना जीवनात मजा नाही. पोहण्याविना जीवन अधुरे आहे. माझ्या बाबतीतच बोलायचे तर पोहणे जीवनच आहे.

एके दिवशी बाबांच्या मित्राचा त्यांना फोन आला. माझे भाग्य उजळायला तो फोन फार महत्त्वाचा होता. बारामतीत जायंट्स् ग्रुपने वीर सावरकर नावाचा पोहण्याचा तलाव बांधला होता. त्या तलावात पहिल्याच वर्षी पोहण्याच्या स्पर्धा आयोजित केल्या होत्या. या पोहण्याच्या स्पर्धेत मी भाग घेतला. पहिल्यांदाच पोहण्याच्या स्पर्धेत भाग घेतल्याने मलाच काय कोणालाही फार भीती वाटली असती. त्या स्पर्धेत माझा पहिला नंबर आला व मला माझे पहिले पोहण्याचे प्रशस्तीपत्रक व एक ट्रॉफी मिळाली. ते बक्षीस माझ्या सगळ्यात आवडीचे आहे असे मी मानते.

मी इयत्ता चौथीत येईपर्यंत मला माहीतच नव्हते की पोहण्याच्या स्पर्धा शाळेकडूनही खेळल्या जातात. मला वाटते पोहणे मला जमत असेल हे शाळेत कुणाला माहीतच नव्हते त्यामुळे इतक्या वर्षात कुणी मला विचारले नसावे. पण चौथीत मी पोहण्याच्या स्पर्धेत भाग घेतला. मी पोहण्याच्या प्रत्येक प्रकारात नाव नोंदविले. तालुकास्तरीय स्पर्धा आमच्याच पोहण्याच्या तलावावर झाल्या. माझा सगळ्या प्रकारांत नंबर आला. मला माझ्या पोहण्याचा अभिमान वाटू लागला.

वीस-पंचवीस दिवस उलटले असतील. आता जिल्ह्याच्या स्पर्धा जवळ आल्या. या स्पर्धा पाचगणीला होत्या. मी


पहिल्यांदाच इतक्या मोठ्या आणि माहीत नसलेल्या ठिकाणी आले होते. पाचगणी थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिध्द आहे. थंडीत पाण्याची काय अवस्था असेल? अशा पाण्यात पोहणे मला शक्य होईल का? पाण्याचा अंदाज घेण्यासाठी स्पर्धा चालू होण्यापूर्वी मी एक फेरी मारून घेतली. पाणी जरा थंडच होते पण माझा नाईलाज होता. एवढ्या थंडीत पहिल्यांदाच जिल्हास्तरीय खेळून देखील माझा तिसरा नंबर आला. मला आनंदही होत होता व वाईटही वाटत होते. आनंद याचा की मी पहिल्यांदाच जिल्हास्तरीय खेळले होते व दुःख याचे की एवढे प्रयत्न करून देखील माझा तिसरा नंबर आला होता. पण या अनुभवामुळे माझ्या पुढच्या प्रवासात सुधारणा झाल्या.

मग मात्र मी एकाच प्रकारात भाग घेण्याचे ठरवले. त्यात मी तालुकास्तरीय पास केली, जिल्हास्तरीय पास होऊन मी विभागीय पर्यंत पोचले. पण दुर्दैवाने विभागीयमध्ये माझा तिसरा नंबर आला. एका नंबरसाठी मी राज्यस्तरापर्यंत पोचले नाही. त्याचवेळी मी मनाशी निश्चय केला की पुढच्या वेळी चांगला प्रयत्न करून राज्यस्तरापर्यंत पोचायचे.

तो निश्चय पूर्ण करण्याचे माझे प्रयत्न सध्या चालू आहेत. मला वाटते,


जे साध्य करणे शक्य आहे,
ते साध्य झालेच पाहिजे.
जीवनातील एक-एक क्षण
हा प्रयत्नातच घालवला पाहिजे
त्यामुळे जे साध्य होईल ते गोडच
असेल !

■



# अपघात

प्रज्ञा गायकवाड
इयत्ता ७ वी



सोहमने नुकतीच बारावीची परीक्षा दिली होती. त्या परीक्षेत त्याला चांगले गुण मिळाले. आता पुढे काय करायचे याचा प्रश्न पडला होता. त्याला इंजिनियरींगमध्ये रस होता. त्यासाठी त्याने सी. ई.टी. ही दिली. मागच्या परीक्षेसारखे याही परीक्षेत त्याला यश आले. आता प्रवेश कुठे मिळणार? असा प्रश्न मनात उभा राहिला. पुण्याच्या इंजिनिअरींग कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला. पण सोहमचा आनंद जास्त काळ टिकला नाही. काही कागदपत्रांची पूर्तता झाली नसल्याने त्याचा प्रवेश रद्द करण्यात आला. काही दिवस सोहम अस्वस्थच होता. अचानक एक दिवस पोस्टमन एक आनंदाची बातमी घेऊन आला. सोहमला धुळ्याला शेती कॉलेजात प्रवेश मिळाला होता. सोहम ताईबरोबर धुळ्याला गेला. कॉलेज बघितल्यावर त्याला खूप वाईट वाटले. येथे प्रवेश न घेण्याचे ठरवून ते पुण्याला यायला निघाले. ताईचे औरंगाबादला काम होते. ते उरकून निघायचे ठरले. औरंगाबादचे काम आटपायला ८:३० वाजले. पुण्याची शेवटची बस चुकल्यामुळे त्यांनी खाजगी बसने जायचे ठरवले. सोहम म्हणत होता की खाजगी बसचा माझा अनुभव चांगला नाही तरी ताईचा नवरा म्हणाला, “नको आज रात्री पोचलेच पाहिजे. चल पटकन.”

सोहमच्या मनात भीतीची पाल चुकचुकत होती.

सोहम त्या बसमध्ये बसला. गाडी हळूहळू चालली होती. रात्री बारा एकचा सुमार. सर्व लोक गाढ झोपले होते. अचानक गाडीच्या इंजिनमधून ठिणग्या येऊ लागल्या आणि त्या ठिणग्यांचे रूपांतर भीषण आगीत कधी झाले ते कळलेच नाही. सर्व गाडीत धूर झाला. त्यामुळे सगळ्यांना जाग आली. लोकांनी आरडा-ओरड सुरू केली. चालकाने गाडी रस्त्याच्या कडेला थांबवली. लोकांनी दरवाज्यामधून उड्या घेतल्या. काहींनी काचा फोडून खिडकीतून उड्या मारल्या. बघता बघता गाडीने पेट घेतला. आतील सर्व सामान गाडीबरोबरच जळाले. सगळी बस पेटून त्याचे राखेत रूपांतर झाले. गाडीबरोबर सोहमची सारी कागदपत्रेही जळून गेली. त्याला खूप वाईट वाटले. त्याच्या डोळ्यांतून अश्रूधारा ओघळू लागल्या.पायात चप्पलही नाही अशा अवस्थेत तो जळणाऱ्या गाडीकडे बघत उभा होता.

त्या अपघातानंतर सोहमला बरेच दिवस झोप लागली नाही. कागदपत्रे गमावली पण नशिबाने जीव मात्र वाचला. आयुष्यच नसेल तर कागदपत्रांचा काय फायदा?

■

'एक प्रसंग', पान ११ वरून

माझ्याकडे येत होता. तो जरा जरा जवळ आल्यावर मला कळले तो कंदील घेऊन एक माणूस येत होता. तो माझ्या दुकानात आला. तो विचित्र दिसत होता. केस वाढलेले. दाढी वाढलेली. कपाळावर गंध. कानात रिंग घातलेली व हातात कडे असा तो माणूस होता. त्याने माझा हात दाबला. तेव्हा माझे पाय भीतीने लटलटा कापू लागले. त्याने माझ्या हातात काही पैसे दिले आणि म्हणाला मेणबत्ती दे. मी डबे शोधत होतो पण माझे लक्ष त्या माणसा कडेच होते. मला मेणबत्तीचे पाकीट सापडले. त्या पाकिटातली एक मेणबत्ती काढून त्या माणसाला दिली. ती घेऊन त्याच्या रस्त्याकडे तो निघाला. त्याची चाल तर वाघावाणी होती. तो चालत चालत दिसेनासा झाला. माझ्या मनातली भीती नाहीशी झाली. काही वेळाने लाईट आली आणि मी कंदील विझवला व दुकान बंद करून घरात जेवायला गेलो.

■

# चोरी

**रेश्मा शिंदे**

**इयत्ता ७ वी**

पाहुणेवाडी नावाच्या एका गावात दोन-चार वस्त्या होत्या. त्या गावात प्रत्येक घर कष्ट करून स्वाभिमानी जीवन जगत होते. त्यातच बारीकरावांचे घर होते. त्यांच्याकडे भरपूर शेतीवाडी होती आणि जनावरेही होती. एकदा पहाट झाली की बारीकराव आपल्या सर्व जनावरांना नदीवर नेऊन धुवून आणत. त्यांना शेवरीचा पाला, घास, कडवळ असे पोटभर खायला घालत. अशातच त्यांचा कसा वेळ जायचा कळायचेच नाही.

त्यांच्याकडे जी जनावरे होती त्यातच हरिणी नावाची एक शेळी होती. हरिणी गाभण होती. त्यामुळे बारीकराव हरिणीची नेहमीपेक्षा जास्तच काळजी घेत असत. जसजसे दिवस भरू लागले तसतशी हरिणीची पावले अवजड होत गेली. बारीकराव हरिणीला स्वतः संध्याकाळीच फिरवून आणत आणि लगेच बांधत. हरिणीने एका पोर्णिमेच्या रात्री दोन गोंडस करडांना जन्म दिला. त्या करडांच्या कपाळावर चंद्रकोर होती. त्या करडांची नावे बारीकरावांनी कुशी आणि सुशी अशी ठेवली. कुशी आणि सुशी दिवसभर पाहुणेवाडी गावाच्या निसर्गरम्य वातावरणात बागडत. आणि रात्री आपल्या हरिणी आईच्या उबेत लोळत असत. असे त्यांचे जीवन आनंदी व सुरळित चालले होते. **पान नं ३२ वर पहा**



# भीतीचे ढग

**दीपिका जाधव**

**इयत्ता ७ वी**

पावसाळ्याच्या झिमझिमणाऱ्या सरी अजूनही आठवतात. लवलवत्या पात्यावरून ओघळणारा तो पावसाचा थेंब म्हणजे एक अद्‌भूतच दृष्य. या मन मोहून टाकणाऱ्या पावसाच्या दृष्यातच तो दिवस आठवतो आणि मनात काहूर माजवणारा तो दिवस आठवला की, हे स्वर्गसुख नरकाहून भयानक वाटू लागते.

उन्हाळ्याचे दिवस सरत होते. या दिवसांत माझी आत्या आली होती. तिला एक छोटी मुलगी होती. तिचे नाव होते दीप्ती. नावाप्रमाणेच ती गोड होती. सर्वांची लाडकी होती ती. त्या दिवशी दुपारचे जेवण करून आम्ही इकडे-तिकडे हिंडत होतो. याच वेळी आकाशात काळे मेघ दाटून आले. वादळी वारे सुरू झाले आणि बीजगर्जनेसह वर्षाऋतूचे आगमन झाले. आम्ही मुले नाचतच बाहेर आलो व अधाशासारखे त्या पावसाचा आनंद लुटत राहिलो. पण नियतीच्या मनात कधी काय येईल काही सांगता येत नाही.यात दोष कोणाचा कोणास ठाऊक? पण मी म्हणेन जे झालं ते फार वाईट झालं.तुम्हाला आता कोड्यात न टाकता सविस्तर सांगते.

पावसात खेळत असतानाच दीप्तीचा पाय चिखलावरून घसरला आणि समोरच्या मोठ्या दगडावर तिचे डोके जोरात आदळले. मार इतका जोरात लागला की ती क्षणात बेशुध्द झाली. तिच्या डोक्यातून रक्ताच्या धारा वाहू लागल्या.त्या जमिनीवर पडलेल्या जलधारांमध्ये रक्ताचा एक एक थेंब विलीन होत होता.


आम्ही सगळे खूप घाबरलो.सारे जण गोळा झाले. सगळ्यांच्या डोळ्यातून पाणी आले. रक्त, पाणी, पाऊस आणि अश्रू यांचा त्रिवेणी संगम तिथे तयार झाला. काय करावे ते कोणालाच काही सुचत नव्हते. आम्ही लगेच तिला दवाखान्यांत नेले. पण दवाखान्यात नेईपर्यंत तिच्या शरीरातील रक्त खूप वाहून गेले होते. आम्ही पळतच डॉक्टरांकडे गेलो. त्यांनी तिच्या हाताची नाडी पाहिली आणि डोळ्यांना हात लावत जे सांगितले त्यामुळे सर्वांचे डोळे पाण्याने डबडबले. सारे वातावरण शोकसागरात बुडून गेले.

तो दिवस आणि तो पाऊस कधीच कोणाच्या आयुष्यात येऊ नये, असे वाटते. दीप्तीने साऱ्यांना लळा लावला होता पण ती आम्हाला सोडून कायमचीच निघून

गेली. पुन्हा कधी न येण्यासाठी.

अजूनही पाऊस पडला की त्या दिवशीच्या त्या पावसाची आठवण येते आणि मनात भीतीचे ढग फिरू लागतात. पण या ढगांतून पाऊस कधीच पडू नये. कधीच पडू नये...कधीच...

■



## आयुष्य

आयुष्य म्हणजे काय असतं?
एक मातीचं भांडं असतं
त्याला आपण घडवायचं असतं

आयुष्य म्हणजे काय असतं?
एक पाण्याचं तळं असतं
त्याला आपण खोदायचं असतं

आयुष्य म्हणजे काय असतं?
एक सुंदर फूल असतं
त्याला कधीच तोडायचं नसतं

आयुष्य म्हणजे काय असतं?
ते सुंदर पुस्तक असतं
ते वाचून काढायचं असतं

आयुष्य म्हणजे काय असतं?
एक सुंदर शिंपल्यातला मोती असतो
ज्याला कधी हरवायचा नसतो.

**शलाका उंडे**
**इयत्ता ८ वी**

# जम्मू प्रवास

**प्रथमेश इनामदार**

**इ. ४ थी**

सर्व विद्यार्थ्यांवर परीक्षेचा ताण हा असतोच. शेवटचा पेपर संपला व सुट्टी लागली की सर्वजण कोठे ना कोठे जाण्याचा बेत आखतात. तसा आम्ही जम्मूला जाण्याचा बेत आखला. अगोदर हा विषय चेष्टेचा वाटला पण आम्ही मनाची तयारी केली व जायचे ठरवले. त्या दृष्टीने तयारी सुरू केली. सामानाची बांधाबांध केली. डबे बनवून घेतले. पहाटे ४ वाजता घरातून निघालो. स्टेशनवर आलो. येऊन प्लॅटफॉर्मवर जातच होतो तेवढ्यात, 'गाडी आज रद्द झाली' याचे निवेदन ऐकले. लगेच तिकीट रद्द करून दुसऱ्या दिवशीचे तिकीट काढले.

दुसऱ्या दिवशी गाडीत बसलो व गाडीने फलाट सोडला. आम्ही खूप आनंदी होतो पण नंतर तिकीट तपासनीसाने सांगितले गाडी जरा लांबून जाणार आहे कारण पालघर जवळील पुलाला जलसमाधी मिळाली आहे. म्हणजे आता एका दिवसाच्या प्रवासाला तीन दिवस लागणार होते. रात्री आम्ही पंजाबमध्ये आल्यावर आमच्या डब्यातील वीज गेली. सर्व डब्यात अंधारच अंधार. पप्पांनी खाली उतरून तक्रार नोंदवली. गाडी तपासणीसाठी रेल्वे पोलिस तसल्या अंधारात गाडीतील सामानाची तपासणी करत होते. सकाळी आम्ही जम्मूला पोहचताच सगळीकडे पोलिसांच्या गाड्या, बंदूक रोखून सैनिक आणि त्यांच्या छावण्या दिसू लागल्या.

आतापर्यंत बातम्यांमध्ये ऐकलेले, पाहिलेले आम्ही प्रत्यक्ष पहात होतो. नंतर आम्ही बसमधून प्रवास सुरू केला. डोंगरावरील हिरवीगार गर्द झाडी, डोंगर आणि त्यात सैनिक, त्यांच्या छावण्या व थोड्या थोड्या अंतरावरील तपासणी केंद्र हे सर्व पार पाडून आम्ही कटरा येथे पोहोचलो. तिथे आम्ही खोली घेतली. नंतर पटपट आवरून आम्ही खोली बाहेर पडलो. आता आम्हाला १४ कि.मी. एवढा डोंगर चढायचा होता. सर्वांनी वर जाण्यासाठी घोडे ठरवले. काही वेळेला घोडेवाले आमच्या बरोबर चालले पण नंतर ते सर्वजण मधल्या पायवाटेने आणि आम्ही रस्त्याने निघालो. घोडे वळणावर अगदी डोंगराच्या कडेने वळाले की भीती वाटायची. थोड्या वेळाने वरून खाली येणाऱ्या काही मुलांनी पाण्याच्या मोकळ्या वाटल्या पायाने उडवल्या. त्या बाटल्यांच्या

आवाजाने घोडे घाबरले व उलट्या दिशेने पळाले. एका घोड्यामागोमाग तीन-चार घोडे पळतच सुटले. एका बाजूला दरी व दुसरीकडे डोंगरांची भिंत आता आपण संपलो असेच वाटले पण नंतर घोडे आवरले व आम्ही देवळाजवळ पोहचलो.

वैष्णवदेवीच्या देवळाभोवतीचा परिसर खूपच सुंदर होता. तेथील निसर्ग, यात्रेकरूंसाठी असलेल्या सोयी, स्वच्छता, हे पाहून प्रवासाचा शीण एका क्षणात नाहीसा झाला. गुहेत जाताना जवळ कोणतीही वस्तू नेता येत नव्हती. गुहेची रचना अत्यंत छोटी होती. त्यातच आत एक मोठा दगड. मला पलिकडे जाता येईना. म्हणून मामाने मला दगडावरून पलिकडे अक्षरशः ढकलले व आईने पलिकडून उतरवून घेतले. पाण्यातून आम्ही देवीजवळ पोहचलो. पुजाऱ्याने थोडक्यात माहिती सांगितली. तेथील धार्मिक वातावरण पाहून आमची तहानभूक हरपली.

भैरवनाथ नावाच्या राक्षसाचं दर्शन घेतल्याशिवाय यात्रा सफल नाही म्हणून तिथे जाण्याचे ठरवले तर ते मंदिर मूळ मंदिरापासून आणखी वर २ कि.मी. तिथे जाण्यासाठी आम्ही सुसज्ज झालो. पण अचानक झालेल्या गारपिटीमुळे आमचा बेत फसला व आम्हाला मुक्काम करावा लागला. मग सकाळी दर्शन घेऊन खाली येताना अर्धकुवारी नावाच्या गुहेत दर्शनास गेलो. तिथे गुडघ्यावरून रांगत जाऊन दर्शन घेऊन खालून वर साखळी धरून यावे लागते. मी रांगत गेलो पण वर येता येईना. बराच वेळ प्रयत्न केला. रांग पुढे सरकेना. रांग पुढे का येत नाही हे पाहण्यासाठी पोलिस आले. त्यांनी मला ओढून बाहेर काढले.

तेथील बाजारपेठ आपल्या पेक्षा निराळी होती. तेथे विकायला शाली, गालिचे, भरतकामाच्या वस्तू, विणलेल्या वस्तू, आकर्षक टोपल्या, बास्केट, टोप्या, ड्रेस इत्यादी वस्तू आणि आक्रोड, बदाम, पिस्ते, काजूंनी भरलेली दुकाने होती. तणावाचे वातावरण असून सुध्दा तेथील लोक पर्यटकांना माहिती देणे, बोलणे, हे काम करीतच होते. सतत होणारे बॉंबस्फोट, दंगल यामुळे ते स्वतः व पोलिस चिडचिड्या स्वभावाचे बनले होते. दुसऱ्या दिवशी आम्ही गाडीत बसलो व मुंबईकडे येण्यास निघालो. आता गाडीला किती दिवस लागणार हे विचारले पण आम्ही एका दिवसात मुंबईला पोहचलो. त्यानंतर दोन दिवसांनी देवळाबाहेर बॉंबस्फोट झाला व बरेच जण मृत्युमुखी पडले हे वाचले व पाहिले. आम्ही त्यातून सुखरूप बाहेर पडलो हे जाणवत असूनही भीती वाटत होती. जणू आम्ही मृत्यूच्या दाढेतून बाहेर पडलो होतो.

■

# बिडीचे झाले भजन

विराज तावरे
इयत्ता ७ वी

सुट्टी दिवाळीची आणि दिवस थंडीचे. वेळ तशी दुपारचीच. पण हवेत गारठा फार होता. आम्ही म्हणजे मी अणि मम्मी मयंक दादाची वाट पाहत होतो. ट्रेनला तसा तब्बल अर्धा तास होता. पण दादाचे काम बेभरवशाचे. ट्रेन चारला सुटणार होती. म्हणून दादाला तासाभरात दहा वेळा तरी मोबाईल केला असेल. शेवटी आम्ही रिक्षा मागवणार पण तेवढ्यात वेगात दादा आला आणि जसे काही आम्हीच उशीर केल्यासारखी त्याची गडबड सुरू झाली. शेवटी दादाच्या बाईकवर कसरत करत आम्ही कसेबसे स्टेशनवर पोहचलो. एवढ्यात गाडी सुटण्याची घोषणा झाली. मम्मीने लांबूनच बॅग आत ढकलली. मला आत पळ म्हणाली. एवढ्या घाईतही दादानी मम्मीला वाकून नमस्कार केला. मम्मीने त्याला रागावण्याऐवजी चक्क ड्रेससाठी पैसे दिले.

कर्कश्य शिट्टी वाजवून वळण घेत मोठा उड्डाणपूल ओलांडत गाडी जणू काही भोपाळशी गट्टी-फू करत होती. आम्ही ग्वाल्हेरच्या दिशेने निघालो.

भोपाळहून आमची बुंदेलखंड एक्सप्रेस थोड्या अंतरावर गेली. मम्मी मला ठराविक स्टेशनांची माहिती सांगायची की या मुरैणा



गावात कुख्यात डाकू फूलनदेवी, मलखान सिंग यांचा अड्डा होता. पुढे एका स्टेशन-वरून एक म्हातारे बाबा आणि मुले चढली. बहुतेक ते डबरा स्टेशन असावे. ते आमच्या शेजारी येऊन बसले. थोड्या वेळानी म्हातारबाबांनी एक बिडी काढली व ती पेटवून ओढत बसले. क्षणार्धात त्याचा धूर सगळीकडे पसरला. मी खोकत खोकत म्हणालो मम्मी त्या आजोबांना सांग ना. नाहीतर त्यांना त्यांच्यामागे काय लिहिलंय ते वाचून दाखव. मम्मी त्यांना म्हणाली, "क्यों बाबा आपके पीछे क्या लिखा है? जरा पढो उसे. धूम्रपान करना मना है। धूम्रपान करनेवालों को एक साल की सजा और जुर्माना होगा।". त्या बाबांनी ती बिडी लवकर ओढून फेकून दिली. पण थोड्या वेळाने परत त्यांनी बिडी काढली व ओढायला सुरुवात केली. मम्मी त्यांना परत ओरडली तेवढ्यात तेथून टी.सी. आला त्या बाबांनी ती जळकी सिगारेट चालत्या गाडीतून फेकून दिली. तो बाबा म्हणाले क्या करे हमार समय ही ना कटत है और कछु काम नही। कभू कभू तो पूरा बंडल ही पीत जावे। मग मम्मी बाबाला म्हणाली बीडी पीने से बीमारीयाँ होती है। आपका समय कटता नही तो आप भजन या गाना बोलो।

**पान नं २८ वर**

## सोडत नाही

श्रीमंत असला तरी पैशाची हाव कोणी सोडत नाही
उत्तर आलं नाही तरी प्रश्न लिहायचा कोणी सोडत नाही
पुढे हार दिसली तरी मैदान कोणी सोडत नाही
यमक जुळत नसले तरी कविता करणं कोणी सोडत नाही
नेता पक्ष बदलेल पण राजकारण कधी सोडत नाही
गाणं येत नसेल तरी गुणगुणायचं कोणी सोडत नाही
भाजी कितीही स्वस्त असली तरी पाडून मागायचं कोणी सोडत नाही
निसर्ग कितीही रागावला तरी मदत करणं कधी सोडत नाही.

**मेघा चौधरी**
**इयत्ता ८ वी**

# अविस्मरणीय कॅम्प

**क्षितीजा गोडसे**

**इयत्ता ८ वी**

आम्ही जेव्हा सातवीत होतो, तेव्हा दिवाळीच्या सुट्टीत स्काऊट-गाईडचा कॅम्प हरिद्वारला जाणार होता. आमच्या व आठवीच्या वर्गाला कॅम्पला येण्याबद्दल विचारले होते; परंतु आमच्या वर्गाला वाटले काय करायचे आहे एवढ्या लांब जाऊन नको तो कॅम्प-बिम्प; पण त्यातूनही मेघा, शलाका व पवन जायला तयार झाले. या कॅम्पला जाण्यासाठी त्यांची चाललेली तयारी पाहून आम्हाला खूप वाईट वाटत होते, की आपण हाती आलेली सोन्याची संधी गमावली. आम्ही ठरवले की काहीही होवो पण इथून पुढे जो कोणता कँप येईल त्या कँपला आपण जायचेच.

आम्ही आठवीत आलो. ऑक्टोबरमध्ये नाशिक येथे स्काऊट-गाईडचा शतकोत्सवी राज्यमेळावा होणार होता. आमच्या वर्गातील आठ मुली आणि सातवीच्या वर्गातील दोन मुली असा दहा मुलींचा गट तयार झाला.

आमच्या वर्गातून मी, सायली माने, सायली कुमठेकर, दीपाली पवार, दक्षता काकडे, आरती कदम, करिश्मा मुल्ला, मोहिनी घाडगे, ओंकार मुळीक, प्रतिक काटकर, संदेश यादव, प्रणव रानडे आणि सूर्यजीत इंगळे असा स्काऊट-गाईडचा ग्रुप होता व ७ वीच्या वर्गातून सई भोसले, स्नेहल धायगुडे, प्रथमेश बिदनुर, ओमप्रकाश धुमाळ, अनिकेत ढमाळ, समीर शेख व मुईन आतार असा ग्रुप होता.

नाशिकला जाण्याआधी आम्ही नाच बसविण्यासाठी सातारला गेलो होतो. संपूर्ण जिल्ह्याचा मिळून एकच नाच बसवायचा होता. सपकाळ सरांनी तो दोनच दिवसांत बसविला सुध्दा. आमच्या जिल्ह्याचे गाणे होते, 'सोन्याची जेजुरी' हे गोंधळी गीत. परीक्षा झाल्यानंतर दिवाळीच्या सुट्टीत आमची खरी तयारी सुरू झाली. आयकार्ड साईजचे फोटो काढणे, आयकार्ड भरणे, तंबूसमोर लावण्यासाठी गेट तयार करणे, तंबूत लावण्यासाठी चित्रे काढणे, तक्ते लिहिणे, काठ्या आणणे अशी आमची तयारी चालू होती. डान्सची ड्रेपरी एकसारखी हवी होती म्हणून ती विकत घेण्यासाठी आमचा गाईडचा ग्रुप व आमच्या सगळ्यांच्या आया रात्री उशीरपर्यंत गावात खरेदी करत असायचो. रोज शाळेत येऊन केरळी नृत्य व 'सोन्याची जेजुरी' या नाचाची प्रॅक्टिस

करायचो. शेवटी २८ तारीख उजाडली व आम्ही नाशिकला रवाना झालो.

रात्री बाराच्या सुमारास आम्हाला तंबू मिळाला. दिवसभरच्या प्रवासाने आम्ही खूप कंटाळलो होतो. पण तरीही कोणत्या तरी उत्साहाने आम्ही सर्व सामान घेऊन तंबूपाशी गेलो. जाऊन बघतो तर काय पूर्ण तंबूमध्ये गवत उगवलेले. आम्ही तर हादरलोच. म्हटलं आता रात्र सगळी तंबू साफ करण्यातच घालवावी लागणार. पण बाईंनी आम्हाला दिलासा दिला. त्या म्हणाल्या झोपण्यापुरता अर्धा तंबू स्वच्छ करूया व अर्धा सकाळी करूया. तेव्हा आम्ही एक-दीड तासात अर्धा तंबू साफ करून झोपलो सुध्दा. आम्हाला वाटले आता आपल्याला रोज असे सारखे कामच करत बसावे लागणार आहे. दुसरा दिवस थोडाफार साफसफाईतच गेला. पण बाकीच्या सर्व दिवसांचे वेळापत्रक ठरलेले होते. सकाळी पाच वाजता उठणे, तंबू सजवणे, मग तंबू निरीक्षण, नाष्टा, नंतर साहसी खेळ, आणि दुपारी जेवण. जेवण झाल्यानंतर दुसऱ्या जिल्ह्यातील मुलींशी ओळख करून घेणे. त्यांचे पत्ते, फोन नंबर घेणे, संध्याकाळी नाचासाठी आवराआवर, रात्रीपर्यंत लोकनृत्य स्पर्धा, शेकोटी कार्यक्रम, रात्रीचे जेवण आणि मग झोप. या सर्व दिनक्रमामुळे पाच दिवस कसे फुलपाखरासारखे उडाले ते समजलेच नाही.

शेवटच्या दिवशी समारोप कार्यक्रम होता. प्रमुख पाहुणे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आर.आर. पाटील होते. त्यांच्याच हस्ते बक्षीस वितरण होणार होते. आम्ही सगळ्या गाईड युनिफॉर्ममध्ये एरिनामध्ये चाललो होतो. तेवढ्यात दक्षता पळत आली व मला म्हणाली, "पतंगेबाईंनी तुला बोलावले आहे, तुझ्या घरून फोन आला आहे." घरचा फोन आला आहे हे ऐकताक्षणी मी धावत पतंगेबाईंकडे गेले. मला पाहिल्यानंतर बाई काही न बोलता माझा हात धरून मला स्टेजकडे घेऊन जाऊ लागल्या. मला काहीच समजेना. शेवटी स्टेजजवळ गेल्यावर मला बाईंनी सांगितले की सातारा जिल्ह्याचा फूड प्लाझामध्ये नंबर आला आहे, व त्यासाठी आर.आर. पाटील यांच्या कडून बक्षीस आणायला तू जायचे आहेस. हे ऐकताक्षणी मी जमिनीवरून हवेतच उडाले. माझा विश्वासच बसत नव्हता की मी आर.आर.पाटील यांच्याकडून बक्षीस स्वीकारणार आहे. मला आनंद तर खूपच झाला होता पण मनात एक अनामिक भीती दाटलेली होती. आर.आर. पाटील हेलिकॉप्टरमधून आले. त्यांचे आरती ओवाळून, स्काऊटचा स्कार्फ-ओगल घालून स्वागत झाले. आम्ही बक्षीस आणायला आलेलो सर्वजण एका रूममध्ये शांत बसलेलो होतो. जसजशी वेळ जवळ येत होती तसतशी माझी उत्सुकता वाढत होती. मनात खूप प्रश्न दाटले होते, की मी स्टेजवर जाईन तेव्हा आर.आर. पाटील मला काय विचारतील? मी त्यांना उत्तर देऊ शकेन का? तसेच माझ्या मैत्रिणींना मी एवढ्या लांबून ओळखू येईन का? अशा नाना प्रश्नांनी माझ्या डोक्यात गोंधळ

घातला होता. पण मला राहून-राहून वाटत होते की आता आई-पप्पा आणि घरातील सर्व लोक असते तर माझा आनंद द्विगुणित झाला असता.

बक्षीस आणायला जाण्यापूर्वी आम्हा सर्व बक्षीस स्वीकारणाऱ्या मुलांना बक्षीस कसे स्वीकारायचे हे दाखवले जात होते.

फलटण". जोरात टाळ्यांचा कडकडाट झाला. मी फोटो-शोटो झाल्यावर स्टेजवरून खाली आले व सरळ बाई व मुली जिथे बसल्या होत्या तिथे गेले. सर्वजण माझे अभिनंदन करत होते. पण मला समजले नाही की माझे अभिनंदन कशासाठी होत आहे? कारण त्या




आम्हाला सांगण्यात आले की परेड करत आर.आर. पाटलांपर्यंत जायचे व एक पाऊल पुढे टाकून गुडघ्यात वाकायचे. आम्ही त्याप्रमाणे प्रॅक्टिस केली.

काही वेळाने बक्षीस वितरण समारंभ सुरू झाला. प्रथम अमरावती जिल्ह्याचे नाव पुकारले. नंतर सातारा जिल्हा असे नाव पुकारले. साताऱ्याचे नाव ऐकताच माझ्या पायात उत्साहाचे बळ दाटले. मी परेड करत स्टेजवर गेले. सुहास्य वदनाने फुलांचा गुच्छ व ट्रॉफी स्वीकारली. आर.आर. पाटलांनी विचारले तू कुठून आलीस? शाळेचे नाव काय? मी लगेच उत्तर दिले, "कमला निंबकर बालभवन,

बक्षिसाची मानकरी मी एकटी नव्हते तर संपूर्ण सातारा जिल्हा होता.

समारोप कार्यक्रम संपला. आम्ही फलटणला माघारी आलो. पण माझ्या मनातून बक्षीस घेतानाचा क्षण काही जातच नव्हता. परंतु माझे दुर्दैव म्हणूनच की काय, मी बक्षिस घेत असतानाचा एकही फोटो अथवा व्हिडिओ शूटिंगची सी.डी. मला मिळाली नाही. पण माझ्या व माझ्या मित्रमैत्रिणींच्या डोळ्यांत तो क्षण अजूनही आहे. तुम्ही सर्व आमच्या डोळ्यांतच तो क्षण फोटोपेक्षा अधिक चांगल्या रीतीने पहाल.

■

## कळलं का?

आपल्याला कळतं
ते ज्याला कळतं
त्याला सारं काही कळतं
आपल्याला कळत नाही
जे ज्याला कळतं
त्याला कळतं
त्याला थोडंफार कळतं
जे ज्याला कळत नाही
त्याला काही कळत नाही
हे ज्याला कळतं
त्याला तर कधीच कळत नाही
कळलं का?

**करिश्मा मुल्ला**
**इयत्ता ८ वी**

## अधुरे नाते ठेऊ नको

बोलायचे नसेल तर बोलू नको
पण अबोल मात्र होऊ नको
हसायचे नसेल तर हसू नको
पण खऱ्या अर्थाने रुसू नको
सोडून दिली मैत्री तरी चालेल
पण एकटी मात्र राहू नको
आठवण ठेवायची नसेल तर ठेऊ नको
पण अनोळखी मात्र होऊ नको
नाही केलेस प्रेम तरी चालेल
पण तिरस्कार मात्र करू नको.

**शलाका उंडे**
**इयत्ता ८ वी**

**'बिडीचे झाले भजन' पान २४ वरून**

थोड्या वेळाने त्या बाबांनी भजन म्हणायला सुरुवात केली. शेजारच्या विभागामधील लोक भजनी मंडळाचे होते. तेही आले आणि त्यांनी एका ताला-सुरात भजन म्हणायला सुरुवात केली. एका भजनाची आठवलेली ओळ—

जय जय जय नटवर गिरधारी
बिगरी बात बनाओ हमारी
करहूँ दे साकार सपनवा
हो ऽऽऽ बरखा दे रे बदरवा!
हो ऽऽऽ जय जय जय

सर्व जण बेभान होऊन ते भजन ऐकू लागले. भजन गाण्यात दोन तास केव्हा गेले हे कळलेच नाही. या दोन तासांत त्या बाबांनी एकही बिडी ओढली नाही.

त्यांनी शेवटी आपली चूक कबूल करून सर्वांची माफी मागितली व कधीही बिडी पिणार नाही याची शपथ घेतली. ■

# लेकरू

**सई भोसले**

**इयत्ता ७ वी**

ज्ञानोबा आजोबांचे घर एका नारळाच्या झाडाच्या झावळ्यांनी लपले होते. समोरच्याच समुद्रासारख्या अफाट जागेला त्यांनी आपले अंगण मानले होते. त्यांचे घर खूप खूप मोठे होते. त्या एवढ्या मोठ्या घरात ते एकटेच राहत होते. त्यांच्या पत्नीचे काही वर्षांपूर्वीच निधन झाले होते. त्या आजोबांना दोन मुले होती. त्यांतील एक मुलगा अमेरिकेला व दुसरा मुलगा युरोपला होता. आजोबांनी मुलांना कोणतीही गोष्ट अपुरी पडू दिली नव्हती. पण त्याच आजोबांना ती मुले विसरली होती. ती दोन्ही मुले दुसऱ्या देशात गेल्यापासून एकदाही आजोबांना भेटायला आली नव्हती.

पण एवढे सगळे होऊनही आजोबा नेहमी खूष दिसत असत. त्यांनी समुद्रासारख्या अफाट अंगणात फणस, आंबा, चिकू यांची झाडे लावली होती. तसा आजोबांना झाडांचा ध्यास भारी होता. कुणाचाही वाढदिवस असो ते त्यांना आपल्या अंगणातील रोपटे द्यायचे आणि म्हणायचे ह्या रोपट्यांचा गुण नेहमी आपल्या अंगी बाळग. झाड हेच आपले जीवन आहे. माझी भेट म्हणून हे झाड आपल्या अंगणात लाव, त्याला पाणी घाल, आणि त्याची मायेने मशागत कर. मग बघ हेच झाड तुला फळे देईल.

असेच एकदा आजोबा आपल्या जुन्या पण आजही ताज्यातवान्या असणाऱ्या आठवणी काढत मनातल्या मनात हसत होते. तेवढ्यात त्यांच्या घराचे फाटक वाजले. आजोबांनी खुर्चीत बसून विचारले कोण आहे? पण काहीच उत्तर आले नाही. म्हणून ते फाटकाजवळ गेले आणि त्यांनी इकडे तिकडे पाहिले पण कुणीच नव्हते. ते आतमध्ये आले आणि पुन्हा खुर्चीत बसले. नि मनाशीच म्हणाले जाऊ देत, असेल कुणीतरी. इतक्यात पाठीमागून त्यांच्या डोळ्यांवर कुणीतरी हात ठेवला. नाजूक हात, हातात बांगड्या. क्षणाचाही विलंब न लावता आजोबांनी पटकन ओळखले कारण ती होती मालन, जी लहानपणापासून आजोबांच्या सान्निध्यात हसत खेळत बागडत मोठी झाली. आजोबा तिला आपल्या नातीप्रमाणेच समजायचे. ती आजोबांची सर्व कामे करायची. त्यांच्या झाडांना पाणी घालायची, अंगण साफ करायची, आजोबांना वेळेवर औषध द्यायची. अशी ही गुणी मालन

मोठ्यांचा आदर करायची. आजोबांची खूप लाडकी होती. आजोबा तिला लाडाने लेकरू म्हणायचे.

मालन आजोबांच्या घराशेजारीच राहायची. तिच्या घरात तिचे बाबा, सावत्र आई, सावत्र भाऊ, सावत्र बहीण आणि ती रहायची. तिची सावत्र बहीण तिच्यावर खूप जळायची. कारण मालन दिसायला छान होती व बुध्दीनेही चलाख होती. तिची सावत्र आई तिचा खूप छळ करायची. ती जन्मल्यावर तिच्या आईचे निधन झाले त्यामुळे, अपशकुनी म्हणून तिच्यावर शिक्का पडला. तिला त्या लहान वयात जे आईचे प्रेम हवे होते ते मिळालेच नाही. पण हेच प्रेम, हीच मायेची छाया ज्ञानोबा आजोबांनी तिला दिली होती. त्यांनी त्यांच्या लेकराचे नाव शाळेत घातले आणि आजोबा त्याची फी पण भरू लागले. आता लेकरू त्या शाळेत शिकू लागली. आता तिच्या गुणांना त्या शाळेत वाव मिळू लागला होता.

काही वर्षे अशीच गेली. आता लेकराचे शिक्षण हळू हळू पूर्ण होऊ लागले होते आणि आता आजोबांचे वयही वाढत होते. त्यांनी त्यांच्या वयाची पंच्याऐंशी ओलांडली होती. आता लेकरू पुढचे शिक्षण घेण्यासाठी बाहेरगावी गेले. ती दर महिन्याला आजोबांना पत्र पाठवत असे. तिचे पत्र वाचून ते मनोमन सुखावत. पण अलिकडे आजोबांची तब्येत विघडत चालली होती. ते कोणत्याही क्षणी दगावण्याची शक्यता होती. त्यामुळे त्यांनी आपल्या लंगोटी मित्राच्या वकील मुलाला फोन केला आणि त्याला सांगून आपल्यानंतर हे घर आणि शेतीवाडी लेकराच्या नावावर केली आणि एका रात्री ज्ञानोबा आजोबा काळाच्या पडद्याआड गेले. ही बातमी ऐकल्यावर मालन आपले शिक्षण अर्धवट सोडून येईल म्हणूनच वकिलाने तिला ही बातमीच सांगितली नाही. पण मालन आल्यावर तिला जेव्हा ही बातमी कळली तेव्हा ती धाय मोकलून रडली. तिला आजोबांबरोबर घालवलेला प्रत्येक क्षण आठवू लागला. पुढे तिने ज्ञानोबा आजोबांचे घर आणि शेती-वाडी संभाळली. ती आता मोठी इंजिनिअर तर आहेच पण त्याचबरोबर एक उत्तम समाजसेविका देखील आहे. ती अनेक वृध्दांची सेवा करते. तिने एक वृध्दाश्रम देखील बांधला आहे. ज्ञानोबा नावाचा.

पण रोज रात्री तिला स्वप्न पडते. त्या स्वप्नात तिच्यावर आभाळाएवढे प्रेम करणारे आजोबा येतात आणि तिला हाक मारतात लेकरू ... ए ... लेकरू.

■

# रस्त्यावरचा एक कलाकार

**संचिता निंबाळकर**

**इयत्ता ९ वी**

तो होता सुट्टीचा दिवस. सुट्टीचा दिवस म्हणजे मोकळा दिवस जरी वाटत असला तरी आपल्या वाट्याला कामे येणार ती येणारच. जेवण करून दोन घटका विश्रांती घेण्याच्या विचारात होते. वाचनातही मन रमेना, झोपूही वाटेना, कुणाशी बोलावेसेही वाटेना अशा अस्वस्थ अवस्थेत होते. त्यातच उन्हाळ्याचे दिवस असल्याने सूर्य आग ओकत होता. त्यामुळे पंख्याच्या हवेचा तेथे काहीच उपयोग होत नव्हता.

इतक्यात, "भांड्यावर नाव टाकून देणार नाव sss ! अशी अस्पष्ट आरोळी



ऐकू आली. दुपारच्या वातावरणात असा आवाज म्हणजे त्रासच, पण का कोणास ठाऊक मला हा आवाज ऐकून प्रसन्नता आली. त्याच तरतरीने मी बाहेर गेले. दहा-बारा वर्षाचा मुलगा. ठिगळे लावलेली त्याची पँट व पांढरा पण मळलेला शर्ट. तसा काळासावळा, गरीब, गबाळा. त्याच्याकडे पाहूनही अगदी कुणीही बिचारा असे म्हणेल. कोणालाही न विचारता मी त्याला बोलावून तीन-चार भांड्यांवर नावे टाकून घेतली. मशीनचा वापर न करता त्याने आपल्या हस्त-कौशल्याने नाव टाकले. नाव टाकताना खिळ्यांची किण-किण त्यातच लोखंडी पट्टीची टकटक आणि या सगळ्यात असणारी त्याची तन्मयता हे सारे दृश्य भावणारे होते. त्याचे एकेक अक्षर जणू मोत्याचा दाणाच! त्यास पैसे दिले व तो निघून गेला.

पण यामुळे माझ्या डोक्यात विचारचक्र चालू झाले. सध्याचे युग आधुनिक युग किंवा विज्ञान युग म्हटले जाते. आत्ताचा माणूस कमी श्रमात जास्त काम करणे या विचारसरणीचा व संगणक, मोबाईल, लॅपटॉप या तांत्रिक गोष्टींत रमणारा, औद्योगिक विकास साधणारा जरी असला

तरी याच समाजात दोन वेळच्या जेवणाची ऐपत नसलेले, हातावर पोट असलेले दरिद्री लोक विसरायला नकोत. जरी हे दरिद्री असले तरी त्यांच्या अंगी इतरांप्रमाणे मौलिक गुण देखील असतात. कदाचित परिस्थितीमुळे त्यांच्यातील हुशारी, कल्पकता यांस वाव मिळत नाही. जरी या लोकांना शिक्षण मिळत नसले, त्यांचा विकास होत नसला तरी ते आपल्यातील छोट्या छोट्या कला जोपासतात. याच कलेला ते आपल्या उपजीविकेचे साधन बनवतात व नकळत का होईना, स्वतःतील कलाकार जागा ठेवतात.

हे कलाकार आधुनिक कलाकारांइतके यशस्वी नसले तरी त्यांच्याइतकेच महत्त्वाचे असतात.

■

'चोरी', पान १८ वरून

आपल्या कुशी सुशी करडांना आत लहानअशा खोलीत बांधले. पण ते आपल्या लाडक्या हरिणीला खोलीत बांधायला विसरले. त्या रात्री गावात काही चोर शिरले आणि त्यांनी हरिणीला पळवून नेले. इकडे लहानशी सुशी कुशी करडे तहानेने व्याकुळ होऊन आपल्या आईला हाका मारत होती. आणि तिकडे हरिणी आपल्या लहान करडांपासून दूर गेल्याने जोरजोरात मॅं ट ट मॅं ट ट ट करीत होती.

दुसऱ्या दिवशी सकाळ उजाडल्यावर जेव्हा बारीकराव आले तेव्हा त्यांना हा सगळा प्रकार समजला. त्यांना कुशी सुशी यांच्या तोंडाकडे बघून फार वाईट वाटले. कारण आता कुशी सुशी ही दोन्ही करडे पोरकी झाली होती. त्यांना आईच्या मायेची ऊब मिळणार नव्हती. हरिणी चोरीला गेल्याने बारीकराव तर जेवलेच नाहीत. पण कुशी सुशी ही करडंही उपाशी राहिली. बारीकरावांनी त्यांना लहान बाळाची बाटली आणून दूध पाजण्यास सुरुवात केली. पहिल्यांदा त्यांना बाटली तोंडात धरताच येत नव्हती. पण हळूहळू ती त्या बाटलीतील दूध पिऊ लागली आणि आपल्या पायावर उभे राहून बागडू लागली. पण कुणास ठाऊक का, कुशी सुशी दोन्ही करडे रोज रात्री मोठ्याने ओरडतात. बहुतेक त्यांना आपल्या आईची आठवण येत असावी.

■

# माझे मौनव्रत

**मौलिक सोनार**
**इयत्ता ७ वी**

मी मौलिक मौन. या विषयाशी माझा काडीचाही संबंध नाही. माझ्याकडे पाहून अखंड बडबड करणारा हाच तो मुलगा असे माझे नातेवाईक व मित्र मला गौरवाने (खोट्या व चिडवण्यासाठी) म्हणू लागले आहेत. वास्तविक माझी गिनिज बुकात नोंद व्हायला हवी. पण त्यांना खऱ्या गुणांची पारखच नाही. उगाच कुणी नखे वाढवली तर त्यांची नावे मात्र छापत असतात. मूर्ख कुठचे !

एका रविवारच्या सकाळी मी आईकडे मला बॅट आणि बॉल घेऊन दे असं एकूण २८.५ वेळा म्हटलो. कारण एकोणतीसावे वाक्य पूर्ण होण्याआधीच मी अंगातला शर्ट भिरकावला होता. तो चारदोन गिरक्या खाऊन बरोबर आई सोलत होती त्या लसणाच्या पाकळ्यांमध्येच जाऊन पडला. त्याच्यामागोमाग मी चिडून फेकलेला लसूणही आईच्या डोक्यात बसला. आई चिडून मला म्हणाली, "गाढवा लसूण फेकून मारतोस? थांब, आजपासून बोलूच नकोस माझ्याशी." वास्तविक हे फारच झाले. यावेळचं आईचं वर्तन हे एखाद्या नेत्याला शोभण्यासारखं होतं. मी किती बोंबा मारल्या तरी लक्षच नाही! जरा चिडलो तर, "बोलू नको माझ्याशी" असं म्हणाली. "जा जा नाहीच बोलत तुझ्याशी". चिडून मी एक पुस्तक वाचत बसलो. त्यातली एक गोष्ट मला बेफाम आवडली. तिच्यातले आचार्य शिष्यांकडून चूक झाली, की कर मौन धारण, असे करायचे. त्यावरून मलाही एक आयडिया सुचली ती म्हणजे मौन पाळण्याची!

मला पहिलाच प्रॉब्लेम असा आला की घरातल्यांना आपण मौन पाळलंय हे कसं सांगायचं? तेव्हा पहिली दुसरीत वापरलेली व आता केवळ कच्ची गणिते सोडविण्याच्याच कामी येत असलेली पाटी मला आठवली. पेन्सील न सापडल्याने शाळेत फळ्याच्या कमी, एकमेकांना मारायच्या कामीच जास्त उपयोगी येणारा खडू व पाटी यांची विजोड जोडी मी मिळवली. पाटीवरती लिहिले की मी मौन पाळलेय. दुसऱ्याच क्षणी मला वाटले की मी पु.लं.च्या एखादया मजेदार व्याख्यानालाच आलोय. आई पप्पा खो-खो हसत होते. मग म्हणाले, "तुझ्या या निश्चयामुळे तुझी खूपच गैरसोय होईल बरंका!" आणि मग बाजारात निघून गेले. आता मात्र मी खूपच चिडलो. इतक्यात

टेलिफोनची घंटी वाजली. ती घंटी ही माझ्यावरती चालून येणाऱ्या नव्या संकटाची पूर्वसूचना देणारी घंटी होती, हे मला लगेच कळले. फोनवर मी मौन धारण केलंय हे सांगायचं कसं? नंबर बघितला तर तो मामाचा होता. त्याच्या इंटरव्ह्यूची बातमी देणारा फोन असणार हा! बाप रे! माझ्या लक्षात आले की जर इतक्यात एखादा महत्त्वाचा फोन आला तर आपण काहीच करू शकत नाही! ठेवावं का मौन बाजूला? असा विचार क्षणभर मनात आला. पण मी माझ्या निश्चयाचा पक्का होतो.


हा सगळा रिपोर्ट मी आई आल्यावर पाटीवर सादर केला तेव्हा ती फारच चिडली. "गुप-चूप उचलला का नाहीस? बंद कर ते मौन आणि फिरून. . ." अशी मुक्ताफळे उधळली. पण मी जुमानले नाही.

एक दिवस झाल्यानंतर मला बरे वाटायला लागले. एरवी सदैव वटवट करणारा मी आज कसा शांत-शांत होतो. आवाज नाही त्यामुळे मला खूप बरे वाटत होते. शाळेतल्या मुलांनीही माझी चेष्टा करणे बंद केले होते. त्यामुळे ती एक चिंताही टळली होती.

शाळेतून घरी आल्यावर आईने दुकानातून १ किलो कांदे आणायला सांगितले. मी पिशवी आणि अकरा रुपये घेऊन निघालो आणि दुकानात गेल्यावर जेव्हा तोंड उघडले, तेव्हा लक्षात आले की आपण पाटीच आणली नाही. दुकान घरापासून ३ कि.मी. लांब होते. त्यामुळे मी २ किलो कांदे द्या असे पटकन म्हणालो व आलो! घरी आल्यावर जरा दिमागसे विचार केल्यावर मला वाटायला लागले की देवाने एवढे छानपैकी तोंड दिले आहे आणि आपण काय येड्यागत मौन पाळतोय. हा विचार करून वी माझ्या मौनव्रताचा निश्चय वाऱ्यावर सोडला. माझे मौनव्रत संपले. या मौनव्रताचा फायदा मला एकच झाला तो विंदांच्या कवितेवरून सांगतोय.

बोलणाऱ्याने बोलत जावे
ऐकणाऱ्याने ऐकत जावे
बोलता बोलता बोलणाऱ्याने
ऐकणाऱ्याचे मौन घ्यावे.

■



## अन्याय

म्हणे दादा तुम्ही फार भाग्यवान
तुम्ही ब्राह्मण मी असे हीन-दीन

तुमचे शब्द माझे असतील प्राण
मात्र माझं अस्तित्व तर ब्रम्हांडात लीन

सामर्थ्य तुमचे टोचले मनाला फार
कारण आहे मी कुळामुळे लाचार

तेच रक्त तोच वर्ण
जसे तुम्ही तसाच मी

मग कसले हे कूळ अन् कसली ही जात?
कुणी पाडले आम्हास या संकटात?

तुम्ही भाग्यवान मी अभागी का?
तुम्ही सुखी मी दुःखी का?
तुमचा शब्द माझा प्राण . . .
माझा शब्द गतप्राण?

अन्याय नाही राहणार आता
न्यायासाठी मी लढणार आता.

**श्रध्दा कुलकर्णी**
**इयत्ता १० वी**

# दुःख

**नम्रता मगर**

**इ. ९ वी**

शनिवारची एक रखरखीत दुपार. घरात मी निवांत पेपर वाचत पहुडले होते, तेव्हा मला अचानक जोशीकाकूंच्या घरापुढे गोंधळ ऐकू आला. मी बाहेर बघितले तर जोशीकाकू सर्वांना सांगत होत्या बघा आपला मिहीर गेला. काय? मि-ही-र गे गे ला? असं चाचपडत म्हणत ठोकळे आजींनी जमिनीवरच बसकण मारली. शांत व्हा आजी. मुग्धा पाणी आण. नको मला पाणी नको. आता कशाला पाणी? काय करायचंय जगून? एवढे दिवस त्या मिहीरमुळेच तरले होते. हे जगनियंत्या ने रे बाबा मला. हा इतका वाईट दिवस पहायला मला जिवंत ठेवलेस?

त्या असं म्हणताहेत तोच काळेकाकूंना बी.पी. चा त्रास व्हायला लागला. त्यांचं बी.पी. वाढलं. मग त्यांना काकांनी दवाखान्यात नेलं. प्राजक्ताने खडू आणले आणि फळ्यावर ठळक अक्षरांत लिहिले, "शोकदिन! आपल्या सर्वांचे अत्यंत लाडके व प्रिय व्यक्तिमत्व मिहीर वर्मा यांचे निधन झाले. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात विद्यानगर सोसायटी सहभागी आहे. आमची ईश्वरचरणी अशी प्रार्थना आहे की मिहीर आपल्याला पुन्हा जिवंत होऊन पहायला मिळावेत." मला हे सारं अनाकलनीय होतं. पहिला प्रश्न म्हणजे हा मिहीर कोण? आणि जरी त्याचा मृत्यू झाला असेल तर तो परत कसा येईल? मी पुन्हा पाहिले, तर मुग्धाचे डोळे पाण्याने डबडबले होते. माझा मिहीर किती चिकणा नि ऐटबाज होता. यू नो अगदी मला तर तो प्रिय होता. मी त्याच्यासाठी काहीही करायला तयार आहे. ओ माय डिअर मिहीर. . . गीतेंची सून मधुरा अगदी नुसती मुसमुसत होती. माझ्या लग्नामुळेच हे झालेय. पंडितजी (ज्योतिषी) सांगत होते की जर या महिन्यात लग्न झालं तर काहीतरी वाईट होईल. पण यांच्या वर्ल्ड टूरमुळे लग्न केलं आणि हे काय झालं?

चित्रे काकू म्हणाल्या, माझा तर तो मुलगाच होता. त्यांच्या घराचं नीट चालावं म्हणून मी किती उपास-तापास केले, व्रते केली पण काही उपयोग झाला का? मला माहीत आहेत तुमची नाटकं. उपास उपास म्हणणार अन् तेवढेच दुसऱ्याच्या घरचे काहीतरी कारणे सांगून दूध नेणार आणि दुपारी जेवणार. श्रध्देशिवाय व्रते, वैकल्ये करायची नसतात म्हटलं, असे काटेकाकू म्हणाल्या. हो का? मग तुमचे होते ना

श्रध्देचे उपास? मग का नाही मिहीर वाचला? आल्यात मला सांगायला. जरा चूप बसा, दीपाली ओरडली. इथं आपण मिहीरचे दुःख वाटून घ्यायला आलो आहेत की भांडायला? आपण मिहीरला परत कसं आणायचं यावर विचार केला पाहिजे. मी काय म्हणतेय, आपण मीना शर्माला पत्र पाठवूया. प्रत्येकाने दहा पोस्टकार्डे आणूया. वेगवेगळ्या नावांनी, पत्त्यांनी



पाठवूया. विचार होईल अन् मग ती कदाचित मिहीरला परत आणील, इति चंद्रशिल्पा.ओ.के., आता आपण घरी जावूयात.सर्वांचे दुःख थोड मावळले, अन् चेहऱ्यावर आनंदाची छटा दिसली. सर्वजणी घरी गेल्या.

मी पुन्हा घरात जाणार एवढ्यात मोरेकाकू पिंट्याला मारीत होत्या. मी पळत तिथे गेले व विचारले तर म्हणाल्या कार्ट्याला २० रुपये हवे आहेत वही आणायला.एवढी वही महत्त्वाची आहे का? तसे त्याच्या पप्पांनीच दिलेत त्याला दे म्हणून. पण मला पोस्टकार्डासाठी हवेत. मी कशाला म्हणून विचारायच्या आधीच त्या गेल्या. जोशीकाकू पण काकांशी तावातावाने भांडत होत्या. हे बघा मला १०० रुपये द्या. मला पोस्टकार्ड घ्यायचीत आणि काय हो मी जेव्हा तुम्हाला पैसे मागते तेव्हाच कसे तुमच्याकडे नसतात? अग तू पैसेच अशावेळी मागतेस की ज्यावेळी अनेक खर्च येतात. अग परवा आपल्या मिनूची सहल जाणारे. मग त्यासाठी तिला द्यायला हवेत. बिचारी दरवर्षी मला पैसे मागते पण नसतात आणि या वर्षी आहेत तर जाऊ दे ना तिला सहलीला. हे बघा, कशाला तिला सहलीला? उगीच नाटक. आणि काय उपयोग? आम्ही काय सहलीला जाऊनच मोठे झालो? राहू देत. मला ५० पोस्टकार्डं घ्यायचीयेत. मला द्या पैसे. ठीक आहे,

देतो.

मी आणखीनच बुचकळ्यात पडले. आता मात्र मला हा मिहीर कोण याचा छडा लावणे भाग होते. ज्याच्यासाठी एवढी उठाठेव चालली आहे तो नक्की कोण? मी मधुराकडे गेले, तर तिची भांडीवाली तिला म्हणत होती, ताई मला पैसं द्या. २० रुपयं पायजेत. पगारातनी कापून घ्या पण पैसं द्या. मधुराने पैसे देता देता विचारले पण काय गं रमा तुला लिहायला कुठं येतं? ते काय नाय घीन मी कुणाकडनंबी लिहून. त्यात काय? आपला माझा मिहीरला परत आणण्यात खारीचा वाटा.

असूदेत. बरं बरं जा आता तू. मी इतर काही न बोलता पटकन तिला विचारलं काय गं ताई हा मिहीर कोण? ती म्हणाली हे बघ माझं डोकं आधीच दुखतंय मस्करी करू नकोस. मी म्हणाले, अगं सीरियसली खरंच हा मिहीर कोण? मी जणू काय गंभीर अपराध केला आहे असा दृष्टिक्षेप टाकत ती उद्गारली, "मूर्ख. मिहीर माहीत नाही? कोणत्या जगात वावरतेस? अगं 'कभी खाब पुरे हुए' ह्या सीरियलमधला.

सीरियलमधला?????

मी सुन्नच झाले.

■

## आजोबा

जाडे भरडे धोतर अंगी कुडते साधे एक
डोईवरती लाल पागोटे दिसते काय सुरेख*
हाता मधल्या काठीवरची नक्षी फार गोड
तोंडामधे ठेवायची सुपारीची भलतीच ओढ
चपचप वाजणाऱ्या चपलीचे बंद जाडे काळे
लुकलुक लुकलुक करतात ते चष्म्यामधले डोळे
उभा राहिल्यावर दिसे तो पैलवानाचा देह
गोष्टी सांगायला लागल्यावर येई वेगळाच चेव
रागावल्यावर मात्र दिसे चेहऱ्यावर भलताच भाव
जिथे वृक्ष तिथे असते जशी छाया
तशीच करतात आजोबा आम्हावरती माया.

**सुशांत काकडे**
**इयत्ता १० वी**

* या कवितेच्या पहिल्या दोन ओळी दुसऱ्या कवितेतून घेतल्या आहेत.

# A Bad Day

**Dakshata Kakade**
**Standard 8**

I got up very late. My mother shouted at me. So I felt the day started very badly. I brushed my teeth, took a bath and then ate breakfast.

After that I read the paper and watched the news. When I heard that there was a bomb blast in Mumbai I realized that the day was very bad. I packed up my school bag and put on my school uniform and sandals, then went to take my cycle key. But the key was not there. I searched everywhere, but could not find it. I was tired. I sat down on a chair and found the key on the chair. I relaxed.

But when I saw the cycle I felt like crying because the front tire was punctured. ■

# Our Cricket Match

**Abhishek Sawalkar**
**Standard 8**

On Saturday we played a cricket match with the seventh standard boys. We won the toss and decided to bat first. Our openers were Pavan and Pratik. They made a partnership of 26 runs. Pratik hit two fours and one six. Then he was caught out.

Then Akshay Lipare came onto the pitch. He started to play like boom boom Shahid Afridi. He made a half century. He hit five sixes and seven fours. Then Pavan retired hurt and Akshay got out. Then Sandesh came. He made 21 runs. When our innings ended our score was 103/3 in ten overs.

When the seventh standard started their innings they made 14 runs in the first over. But from the second over to the fifth, they made only 20/4. And in the last four overs they made only about 36 runs.

# My Unforgettable Experience

**Standard 8**



One day I went to my uncle's farm to look at his sunflower garden. There were many sunflowers and butterflies. It was colorful and beautiful. I was very happy to look at the flowers and the butterflies. I asked my uncle, "May I take a sunflower?" He said, "Yes."

I ran into the garden to take a sunflower. As I cut a flower I suddenly saw a big yellow and black snake in front of me.



I cried out in fear. I didn't know what to do. I thought of running away but then I realized that the snake was running away and I was still there. How was this possible?

I called my uncle. He came into the garden. When I saw him I relaxed. I told him what had happened to me. Uncle was happy that the snake had not attacked me. Then we went home. This was my unforgettable moment because for the first time I had faced a snake, and he didn't attack me.

**Minal Chavan**

It was the rainy season. The ground in front of the school was filled with water. My friends and I enjoyed ourselves playing in the water. After four days the water decreased. Then my friends and I started playing *lagori*.

We started the match. The ball fell into the mud. I ran after it as fast as I could. Suddenly I slipped and fell into the mud. My hands, pants and shirt were all muddy. Everybody laughed, but I didn't think it was funny. I went home and tried to clean up. I washed up and changed my clothes. But I will never forget this experience.

**Pranav Ranade**



It was summer. I went to my uncle's farm. As I was rûnning around I stepped on a PVC pipe and broke it. I thought my uncle would shout at me, so I started to cry.

Suddenly my uncle came. He saw me crying. He asked, "Why are you crying? I said that I broke the pipe. My uncle laughed and said, "It's OK."

I felt a great sense of relief. Then I went home.

**Rohit Saste**

I like to fish. For some days I used to go fishing every afternoon in the canal. Just caught few small ones and always threw them back. When we went to Dhuldev for our work experience I caught some nice fish from the well. I showed them to my friends and then threw them back into the well.

When I was doing the same thing on the second day, the hook got caught on a stone. My friends and I ran away from that place. We were scared of the mukkadam. We didn't want him to know about my fishing. After he left we used a stick and got the hook loose.


Now I felt like a real fisherman, and I started to keep my fish.

**Shailesh Nale**

# Fearful Sounds, Fearful Silence

**Sharad Nimbalkar**

**Standard 8**



It was morning time. The weather was very nice. Far away at the foot of the hills there was a light fog. After doing some odd jobs on the farm, I went to wander on the path between the stream and the *mal*. I was watching the minnows and frogs in the water, and different types of birds. There was a kingfisher on the bank of the stream. The kingfisher, which is my favorite fishing bird, was watching the fish with one eye, and looking around with the other. In the dark trees the cuckoo was watching silently.

I left the path and started walking on the rock. Although I was watching everything, I was lost in my own thoughts. Everywhere there was pin drop silence. Suddenly I heard the sound of a paddy bird flapping his wings as he flew up from the stream. I was startled. I saw that the frogs had dived to the bottom of the stream because a crow was flying overhead.

I started climbing the rock. I was still watching the fish and frogs in the

water with a cold mind—that is, I was only seeing, not feeling anything. Then suddenly I was frightened by hearing a loud sound.

I turned and looked back. Two iguanas were coming toward me, fighting with each other as they ran. Their running and shrieking made a fearful noise. I was very afraid. I shouted loudly. The iguanas got frightened. One of them ran into the dense brush. The other dived into the stream, splashing the sand of the bottom onto the rock. From the water he stared at me.

Frightened, I started back toward the path. I got even more scared when a bird that had been sitting silently in the dense bushes suddenly flew up with a shriek, flapping its wings, and breaking the dry branches. Then again there was pin drop silence. I didn't like that silence. I ran toward home. ■

# The Real Joy of Rain

**Nikhil Hendre**

**Standard 10**

This happened last Friday afternoon. After our lunch break English was our first period. Manjutai took the next period also. In the first period she taught us a lesson. After that period we were bored. She realized that. She asked us, "Do you want to do something different?" So I suggested that we go for a walk. She nodded. I had suggested that because the sky was overcast and there was a sign of rain. Immediately we stood up full of energy and escaped from the class.

I was very happy because a cool wind was blowing and everywhere there was a smell of earth. Nature looked so beautiful. We reached the dividing road. When we walked a short distance as expected the rain came with a rush. There was no shelter. Then a woman, who knew Manjutai came outside. She told us to come inside. We were shivering with cold. We stopped there for half an hour. The wind was so powerful that a *pan tapri* woudn't have been able to stand in it. When the rain slowed down we ran towards the school. I reached there in a minute.

When I reached the class I was horrified. Our class was floating in rainwater. All the furniture was put in a corner. My books were mixed with others. First I searched for them and put them into my bag. I was hungry and wet. First I dried my clothes and had something to eat. Then we went home. I told my mother and father the whole story. I was very happy after that rain.

It was the first time I experienced the rain with my friends. I realized the real joy of rain.

■

भारतातून वेगाने नष्ट होत जाणाऱ्या पक्षांच्या अनेक प्रजातींपैकी घुबड ही एक आहे. मानवी चेहऱ्याशी असणारे साम्य व रात्रीचा वावर यामुळे घुबडाबद्दल अनेक अंधश्रध्दा समाजात आढळतात. त्यामुळे घुबडांचे जीवन धोक्यात आले आहे.घुबडाच्या अंड्यांचा अथवा पिलांचा वापर गुप्तधनाच्या शोधार्थ किंवा मटक्याचे आकडे लावण्यासाठी करतात. त्यामुळे ढोलीतून घुबडाची अंडी सर्रास पळवली जातात. घुबडाच्या एका पिलाला ५००० रुपये पर्यंत किंमत मिळते. म्हणून पैशासाठी घुबडाची पिले पकडली जातात.

घुबडासारखे शिकारी पक्षी नाहिसे होण्याचे आणखी एक कारण म्हणजे वृक्षतोड. घुबडे झाडाच्या ढोलीत पिले घालतात. परंतु ढोली असणारे जुने, मोठे वृक्ष आज फारच कमी आढळतात. त्यामुळे घुबडांच्या घरटी करण्याच्या जागा कमी होत चालल्या आहेत.

शेतातील उंदीर, कीटक, छोटे पक्षी हे घुबडाचे खाद्य होय. कीटकनाशकांच्या अमर्याद वापरामुळे वनस्पती खाणाऱ्या उंदीर, कीटक वगैरेंच्या रक्तातही कीटक-नाशकाचा अंश आढळतो. असे अनेक उंदीर व कीटक खाल्याने घुबडासारख्या शिकारी पक्षांच्या प्रजनन संस्थेवर परिणाम होऊन त्यामुळे या शिकारी पक्षांच्या प्रजाती धोक्यात येत आहेत.

**डॉ. मंजिरी निमकर**

मलपृष्ठावर असणारी चित्रे ही कमिन्स डिजल इंडिया प्रिंटिंग युनिटच्या नवीन प्रकल्पातील वह्यांची मुखपृष्ठे आहेत. ही सर्व चित्रे विद्यार्थ्यांनीच काढलेली आहेत. पाने मोजून वह्या भरण्याचे कामही विद्यार्थीच करतात. त्यातून त्यांना खऱ्या कमाईची संधी उपलब्ध होते.

